सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १७९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. ११ ऑगस्ट २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


# 'मतचोरी'वरून विरोधकांचा निवडणूक आयोगावर मोर्चा

## राहुल गांधी, प्रियांका गांधी, संजय राऊतांसह अनेक खासदार पोलिसांच्या ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नवी दिल्ली**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बनावट मतदार यादीच्या मुद्द्यावरुन केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले आहेत. या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी निवडणूक आयोगाने आज विरोधी पक्षाच्या ३० सदस्यांच्या शिष्टमंडळाला बैठकीसाठी बोलावले आहे.मात्र, या बैठकीपूर्वी इंडिया आघाडीतील खासदारांनी निवडणूक आयोगाच्या दिशेने मोर्चा काढला. यादरम्यान, अनेक खासदारांना पोलिसांनी ताब्यात घेतले.



दिल्लीत विरोधकांची एकजुटमतचोरीच्या मुद्द्यावरुन सध्या देशातील राजकारण तापले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतदार यादीतील अनियमिततेबाबत गंभीर आरोप केले आहेत. यावरुन आज राहुल यांच्या नेतृत्वात विरोधी पक्षाच्या खासदारांनी संसदेच्या मकर द्वार ते निवडणूक आयोग कार्यालयापर्यंत मोर्चा काढला. मात्र, दिल्ली पोलिसांनी या मोर्चाला परवानगी नाकरल्यामुळे सर्व आंदोलक खासदारांना रोखण्यात आले.बॅरिकेड तोडण्याचा प्रयत्न...मोर्चा रोखण्यासाठी जागोजागी बॅरिकेडिंग लावली गेली आहे. निवडणूक आयोगाच्या कार्यालयाबाहेर दिल्ली पोलिसांसह निमलष्करी दलाचे जवानही तैनात करण्यात आले. मात्र, अनेक खासदारांनी बॅरिकेडवर चढण्याचा प्रयत्न केला. सपा प्रमुख अखिलेश यादव तर बॅरिकेडवरुन उडी मारून दुसऱ्या बाजुला पोहोचले. याशिवाय तृणमूल काँग्रेसच्या खासदार सागरिका घोष आणि महुआ मोइत्रादेखील बॅरिकेडवर चढल्या. पोलिसांनी खासदारांना रोखल्यानंतर सर्व खासदार जागेवरच धरणे आंदोलनावर बसले.अनेक खासदार पोलिसांच्या ताब्यातभारतीय निवडणूक आयोगाच्या सचिवालयाने काँग्रेस खासदार जयराम रमेश यांना पत्र लिहून दुपारी १२:०० वाजता चर्चेसाठी वेळ दिला होता. जागेअभावी जास्तीत जास्त ३० जणांची नावे कळवावीत अशी विनंती आयोगाने केली होती. मात्र, सर्व विरोधी पक्षाचे खासदार निवडणूक आयोगाच्या कार्यालयात जाण्यावर ठाम होते. पोलिसांनी खासदारांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, मात्र कुणीही ऐकायला तयार नव्हते. अखेर दिल्ली पोलिसांनी राहुल गांधी, प्रियंका गांधी, संजय राऊत आणि सागरिका घोष यांच्यासह इतर अनेक खासदारांना ताब्यात घेतले.मतदार यादीवरुन वादमतदार यादीतील अनियमिततेवरुन विरोधकांनी हा लढा सुरू केला आहे. राहुल गांधींसह सर्व विरोधी नेते निवडणूक आयोगावर गंभीर प्रश्न उपस्थित करत आहेत. राहुल यांनी निवडणूक आयोगावर थेट मत चोरीचा आरोप केला आहे. यासंदर्भात त्यांनी काल एक मोहीमही सुरू केली आहे. याअंतर्गत राहुल यांनी एक वेबसाइटही सुरू केली आहे. यासोबतच त्यांनी लोकांना या मोहिमेत सामील होण्याचे आवाहनही केले आहे.

# राज ठाकरेंविरोधात याचिका करणाऱ्यांना सुप्रीम कोर्टाने फटकारले, सुनावणीस स्पष्ट नकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मुंबई**




मुंबईत गेल्या काही दिवसांपासून मराठी आणि अमराठी भाषेवरून वाद उफाळल्याचे दिसून येत आहे. मनसेचे पदाधिकारी काही हिंदी भाषिक किंवा अमराठी व्यापाऱ्यांना किंवा मराठी न बोलणाऱ्यांना मारहाण करत असल्याचं सोशल मीडियातून समोर आलं आहे. यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मराठीच्या मुद्द्यावर मेळावा घेतला होता. या मेळाव्यात राज ठाकरे यांनी केलेल्या भाषणाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. याचिकेत राज ठाकरे अमराठी लोकांविरुद्ध द्वेष पसरवत आहेत, असा आरोप करण्यात आला होता. तसेच मनसेची मान्यता रद्द करावी, अशी मागणी देखील याचिकेत करण्यात आली होती. आता राज ठाकरेंविरुद्धच्या याचिकेवर सुनावणीस सुप्रीम कोर्टाने नकार दिला आहे.

या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी घेण्यास स्पष्ट नकार दिला आहे. न्यायालयाने म्हटले की, ही याचिका केवळ प्रचार आणि प्रसिद्धीसाठी दाखल करण्यात आली आहे. तसेच कोर्टाने याचिकाकर्त्यांना फटकारत विचारले की, तुम्ही हायकोर्टात का गेला नाहीत? उच्च न्यायालय सुट्टीवर आहे का? अशा शब्दांत कोर्टाने याचिकेवर नाराजी व्यक्त केली आहे.

# देवेंद्र फडणवीसांवर टीका करुन मराठा आरक्षण मिळणार का?

## राधाकृष्ण विखे पाटलांचा मनोज जरांगे यांना प्रश्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११धाराशिव :**

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मनोज जरांगे पाटील यांना दोन प्रश्न विचारले आहेत. देवेंद्र फडणवीसांवर टीका करून मराठा आरक्षण मिळणार आहे का? असं राधाकृष्ण विखे पाटलांनी विचारलं. तसेच मराठा समाजाला आरक्षण देता येत नाही, ही शरद पवारांनी जाहीर भूमिका मांडली. मराठ्यांना आरक्षण द्यायला पवारांचा विरोध आहे. त्यावर मनोज जरांगे पाटील का बोलत नाहीत? असाही प्रश्न विखे पाटील यांनी केला. विखे पाटील धाराशिवमध्ये माध्यमांशी बोलत होते.

एकनाथ शिंदेच नाही तर सरकारमधील सर्वच मराठा नेत्यांना संपवण्याचं काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करत आहेत असा आरोप मराठा आंदोलक मनोज जरांगेंनी केला आहे. त्यावर राधाकृष्ण विखे पाटलांनी प्रतिक्रिया दिली आहे.

देवेंद्र फडणवीसावर टीका करणे, मराठा आरक्षणाला फडणवीसांचा विरोध आहे असं सांगणे आणि त्याला जातीय रंग देणे हा प्रकार चुकीचा असल्याचं राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले. फडणीसांच्या काळातच मराठ्यांना आरक्षण मिळालं होतं. महायुतीमध्ये एकनाथ शिंदे साहेबांनीच मराठा आरक्षणाबाबत भूमिका घेतली होती. आजही महायुतीची तीच भूमिका आहे असं विखे पाटील म्हणाले.

**शरद पवारांवर का बोलत नाही?**

राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनीच आपल्याला आरक्षण दिलं आणि ते सुप्रीम कोर्टापर्यंत टिकलं. अडीच वर्षाच्या महाविकास आघाडी सरकारच्या नाकर्तेपणामुळे उद्धव ठाकरे असतील, त्यांचे नेते शरद पवार असतील, त्यांनी आरक्षणासंदर्भात योग्य भूमिका न घेतल्याने आरक्षण घालवलं. स्वतः शरद पवारांनी अनेक वेळा सांगितले की मराठ्यांना आरक्षण देता येत नाही. त्याबद्दल जरांगे पाटील कधीच बोलत नाहीत. फक्त फडणवीस यांच्यावर टीका केली की आरक्षण मिळणार आहे का?

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी २९ ऑगस्टला मुंबईच्या आझाद मैदानात होणाऱ्या आंदोलनाची धाराशिवमध्ये जोरदार तयारी सुरू आहे. जिल्ह्यातील प्रत्येक गावामध्ये चावडी बैठका घेत २९ ऑगस्टच्या आंदोलनाबद्दल मराठा बांधव जनजागृती करत आहेत.

मुंबईतील आंदोलनासाठी आतापर्यंत दहा हजार गाड्यांचं बुकिंग झालं आहे. मनोज जरांगेंचा फोटो असलेले आणि त्यावर 'चलो मुंबई' आशा आशयाचे बॅनर आणि पॅम्प्लेट छापण्याची प्रक्रिया सुरु आहे.

# भाजपचा उद्धव ठाकरेंवर पलटवार : बावनकुळे म्हणाले - खंडणीखोरांचे सरदार कोण? हे सर्वश्रूत, टीका करण्यापूर्वी स्वतःला आरशात पाहा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर**

भाजपने देवेंद्र फडणवीस हे चीफ नव्हे तर थीफ मिनिस्टर असल्याची उद्धव ठाकरे यांची टीका जोरकसपणे फेटाळून लावली आहे. या प्रकरणी या भगव्या पक्षाने ठाकरेंवरच खंडणीखोरांचे सरदार असल्याचा पलटवार केला आहे. उद्योगपतींच्या घराबाहेर जिलेटीन ठेवून तुमच्या नेतृत्वात शंभर कोटींची वसुली सुरू होती. जनता हे विसरली नाही. त्यामुळे फडणवीसांवर टीका करताना आपला भूतकाळ आठवा, असे भाजपने ठाकरेंवर पलटवार करताना म्हटले आहे.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोमवारी भ्रष्टाचाराच्या मुद्यावरून महायुती सरकारवर घणाघात केला होता. तसेच कथित मतचोरीचा दाखला देत देवेंद्र फडणवीस हे चीफ नव्हे तर थीफ मिनिस्टर असल्याचाही आरोप केला होता. त्यांची ही टीका भाजपच्या चांगलीच जिव्हारी लागली. राज्याचे महसूल मंत्री तथा ज्येष्ठ भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रकरणी त्यांच्यावर पलटवार केला. तसेच फडणवीसांवर टीका करण्यापूर्वी उद्धव ठाकरे यांनी स्वतःला आरशात पहावे असा टोलाही हाणला.

**खंडणीखोरांचा सरदार कोण आहे? हे जनतेला माहिती**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, उद्धव ठाकरे, खंडणीखोरांचा सरदार कोण आहे? हे जनतेला माहिती आहे. विशेष म्हणजे विधानसभा निवडणुकीत कोण 'चीफ मिनिस्टर' आहे? आणि कोण 'थीफ मिनिस्टर' हे देखील महाराष्ट्रातील जनतेने दाखवून दिले आहे. वाझे काय लादेन आहे का? असे म्हणत उद्योगपतींच्या घराबाहेर जिलेटीन ठेवून तुमच्या नेतृत्वात शंभर कोटींची वसुली सुरू होती हे जनता विसरली नाही. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताना जरा आपला भूतकाळ आठवा आणि विचार करून बोला.

बाकी इंडी आघाडीत तुमची शेवटच्या रांगेतील किंमत महाराष्ट्राने बघितली. आजही आपल्याला शेवटच्या रांगेत उभे राहावे लागेल म्हणून तुम्ही दिल्लीतील आंदोलनात गेला नाहीत आणि इथे चार टाळके घेऊन आंदोलन केले. तिकडे राहुल गांधींचे आंदोलन सुरू असताना आपली वेगळी चूल मांडून तुम्ही लक्ष वेधण्याचा निष्फळ प्रयत्न केला.


उद्धवजी, तुम्ही मुख्यमंत्री असताना लोकशाहीचा आणि नैतिकतेचा गळा घोटला होता. आज देवेंद्र फडणवीस यांच्यासारख्या प्रामाणिक नेतृत्वावर बोट ठेवण्याआधी तुम्ही स्वतःला आरशात पाहायला हवे. देवेंद्र फडणवीस यांचे काम हे फक्त भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्राचे नाही, तर स्थिर, विकासाभिमुख आणि पारदर्शक प्रशासन देण्याचे आहे. महाराष्ट्रातील जनतेचा देवेंद्र यांच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास आहे. याऊलट तुम्हाला लोकं कंटाळले आहेत, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

# विद्यार्थी स्कुल व्हॅनला राज्य सरकारची मंजुरी, सुरक्षित प्रवासासह बेरोजगारांना रोजगाराची संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मुंबई**

स्कूलबसचे भाडेदर परवडत नसल्याने आपल्या मुलांच्या वाहतूकीसाठी नाईलाजाने अनधिकृत रिक्षांचा पर्याय निवडणाऱ्या राज्यातील तमाम पालकांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने धाडसी पावले टाकली आहेत. शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीसह रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी परिवहन विभागाने स्कूल व्हॅन परवाने वाटप खुले करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतची अधिसूचना लवकरच जारी होईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

परिवहन विभागाने बोलावलेल्या पालक आणि बस संघटना प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत अनधिकृत वाहनांतून विद्यार्थी वाहतूक होत असल्याचा मुद्दा गाजला होता. देशात सुरक्षित विद्यार्थी वाहतूकीसाठी केंद्र सरकारने स्कूल बस नियमावलीचा (ऑटोमोटिव्ह इंडस्ट्री स्टँडर्ड्स अर्थात एआयएस-०६३) आधार घेऊन अद्यावत मानके अर्थात स्कूल व्हॅन नियमावली (एआयएस-२०४ ) तयार केली आहे. चारचाकी १२+१ आसनापर्यंत विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनाला शालेय व्हॅनचा दर्जा देण्यात येणार आहे.



ही वाहने इड-तख या श्रेणीतील असणार आहेत. यात चालक ओळखपत्र, आपत्कालीन निर्गमन, वाहन प्रवेश, स्टोरेज रॅक यांच्या स्पष्टतेसह आसन रचना, अग्निशमन अलार्म यंत्रणा, वाहन ट्रॅकिंग अशा आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञानाचा ही समावेश केला आहे अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

राज्य सरकारकडून परिवहन विभागामार्फत सन २०१८ पर्यंत स्कूल व्हॅनसाठी परवाने देण्यात येत होते. मात्र स्कूल व्हॅन विद्यार्थी वाहतूकीसाठी असुरक्षित असल्याचे सांगत काहींनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. केंद्राच्या मानकानुसार राज्य सरकारने नियमावली तयार करून व्हॅन सुरू करण्याबाबतची सूचनावली प्रसिद्ध केली आहे. त्याआधारे राज्य सरकारने हे धोरणात्मक पाऊल टाकले असुन या संदर्भात अधिसूचना जारी होईल, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले .

# लातुरमध्ये गोपीनाथ मुंडेंच्या पुर्णाकृती पुतळ्याचं अनावरण; मंत्री पंकजा मुंडेंना अश्रू अनावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११लातूर**

आज माझे पिता, आपले सगळ्यांचे लोकनेते गोपीनाथ मुंडे यांची कर्मभूमी असलेल्या लातूर या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या प्रांगणात त्यांचा पुर्णाकृती पुतळा बसवण्यात आला. (चींपवश) या पुतळा अनावरणाच्या कार्यक्रमाला जे उपस्थित आहे ते आपले मुख्यमंत्री आहेत. त्यांनीच मुख्यमंत्री म्हणून पुतळ्याचं उद्घाटन करावं ही गोपीनाथ मुंडेंचीच इच्छा असेल असं पंकजा मुंडे यांनी या वेळी झालेल्या कार्यक्रमात म्हटलं आहे.



आजचा दिवस असा आहे की काय बोलावं मला कळत नाही. ज्या दिवशी गोपीनाथ मुंडे यांचं निधन झालं त्यानंतर त्या धक्क्यात आम्ही सगळेच होतो. मी जेव्हा रुग्णालयात गेले तेव्हा दिल्लीत मला कुणीही ओळखीचं वाटत नव्हतं. त्यावेळी देवेंद्र फडणवीस गोपीनाथ मुंडेंच्या मृतदेहाजवळ उभे होते. त्यावेळी मी देवेंद्र फडणवीस यांना हाक मारत टाहो फोडला होता. मला नितीन गडकरींनी फोन करुन काय घडलं आहे ते सांगितलं होतं. मी रुग्णालयात जाईपर्यंत ते असतील अशी माझी भाबडी अपेक्षा होती. मला त्यांचा मृत्यू स्वीकारण्यासाठी खूप दिवस लागले.

लोकांची ही संपत्ती मला कुठलीही पत, प्रतिष्ठा, संपत्ती यापेक्षा महत्वाची आहे. मला गोपीनाथ मुंडेंनी सांगितलं होतं बेरजेचं गणित करायचं असतं. देवेंद्र फडणवीस यांनी ते गणित तंतोतंत पाळलं आहे. जनतेच्या हितासाठी छत्रपती शिवाजी महाराजांना तहही करावे लागले आणि युद्ध करावं लागलं. मला अनेकवेळा संघर्ष करावा लागला. पण मी कुणाबद्दलच विष बाळगलं नाही. प्रत्येक व्यक्तीला जवळ करायचं हेच माझ्यावर त्यांचे संस्कार होते. यावेळी प्रांजळ आणि सोज्ज्वळ राजकारणाचं उदाहरण गोपीनाथ मुंडे आणि विलासराव देशमुख यांनी दाखवून दिलं. आज गोपीनाथ मुंडे यांचा पुतळा पाहताना मला विलासराव देशमुखांचीही आठवण झाली असंही पंकजा मुंडे म्हणाल्या.

# कोणीही थांबलं नाही... मृत पत्नीला दुचाकीला बांधून पतीचा दुर्दैवी प्रवास

## नागपूर-जबलपूर राष्ट्रीय महामार्गावर धक्कादायक प्रकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर**

भरधाव ट्रकच्या धडकेत पत्नीचा जागीच मृत्यू... महामार्गावर रक्ताच्या थारोळ्यात पडलेली ती... पती अमित यादवने डोळ्यांतून अश्रू पुसत हात जोडून वाहनांना थांबविण्याचा प्रयत्न केला; पण कोणीही थांबले नाही. शेवटी हताश पतीने पत्नीचा मृतदेह स्वतःच्या दुचाकीला बांधला आणि घरी घेऊन जाण्याचा निर्णय घेतला. जणू माणुसकी मेली की काय, अशी वेदनादायक घटना नागपूर-जबलपूर राष्ट्रीय महामार्गावरील मोरफाट्यावर रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

ग्यारसी अमित यादव (३१) हिचा पतीसोबतच्या प्रवासात दुर्दैवी अपघातात मृत्यू झाला. पाऊस कोसळत होता, महामार्गावर गाड्यांची वर्दळ होती. पण मृतदेह उचलून मदत करणारा एकही हात पुढे आला नाही. त्याने तिचा मृतदेह चक्क मोटारसायकलवर मागे बांधला आणि सुसाट वेगाने निघाला.



हा संपूर्ण धक्कादायक प्रकार नागपूर-जबलपूर राष्ट्रीय महामार्गावर रविवारी (दि. १०) सायंकाळी घडला. पोलिसांनी या घटनाक्रमाची व्हिडिओ क्लिप तयार केली.

ग्यारसी अमित यादव ही मूळची करणपूर, जिल्हा सिवनी, मध्य प्रदेश येथील रहिवासी आहे. ती मागील १० वर्षापासून पती अमित भुरा यादव (३५) याच्यासोबत कोराडी नजीकच्या लोणारा येथे राहायची. रक्षाबंधन असल्याने ती पतीसोबत एमएच-४०/डीबी-१९८३ क्रमांकाच्या मोटारसायकलने लोणारा येथून देवलापारमार्गे करणपूरला जात होती.

दरम्यान, देवलापार पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मोरफाटा परिसरात दुपारी ३:३० वाजताच्या सुमारास मागून वेगात आलेल्या ट्रकने (आयशर) त्यांच्या मोटारसायकलला कट मारला व ट्रकच्या चाकाखाली आल्याने तिच्या मृत्यू झाला. त्याचवेळी जोरात पाऊस सुरू असल्याने अमितने नागरिकांना मदत मागितली. कुणीही मदत करायला तयार नसल्याने त्याने तिचा मृतदेह चक्क मोटारसायकलवर मागे बांधला आणि कोराडीच्या दिशेने निघाला.

संपादकीय ......

# आरोपांपलीकडे : निवडणूक घोटाळा सिद्ध करण्याची काँग्रेसची लढाई

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी देशातील निवडणुकांवर घोटाळ्याचे आरोप करून या निवडणुका नियमबाह्य पद्धतीने हाताळण्यात आल्याचे म्हटले आहे. महाराष्ट्र विधानसभा वर्ष २०२४ लोकसभा आणि कर्नाटक विधानसभा निवडणुकांमध्ये मतदार यादी, बोगस मतदार आणि मत चोरी झाल्याचा आरोप राहुल गांधींनी केला आहे. यावेळी त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना निवडणूक आयोगाने निराधार असल्याचे म्हटले आहे. राहुल गांधींनी केलेल्या आरोपांना अवास्तव आणि केवळ राजकीय वक्तव्य असल्याची टिप्पणी निवडणूक आयोगाची आहे. राहुल गांधी यांनी आरोप करताना केलेल्या सादरीकरणात तथ्य असल्याचे विरोधकांचे म्हणणे असताना राहुल गांधी यांनी सादर केलेले 'पुरावे' पुरेसे नसल्याचे सत्ताधार्यांचे म्हणणे आहे. परंतु विरोधकांना हे पुरावे परिपूर्ण असल्याचे वाटणे स्वाभाविक आहे. विषय हा आहे की राहुल गांधी यांनी सादर केलेल्या पुराव्यांना कायदेशीर वैधनिकता आहे का? न्यायालयात हे पुरावे 'असा' घोटाळा सिद्ध करण्यासाठी पुरेसे आहेत का? जर असे असते तर याआधी काँग्रेस आणि विरोधकांनी हा 'घोटाळा' उघडकीस आणण्यासाठी केलेले प्रयत्न कुठे कमी पडले? या प्रश्नाच्या उत्तरात काँग्रेसच्या राजकीय भूमिकेच्या अलीकडच्या काळातील अपयशाचीही कारणे दडलेली आहेत.

वंचित बहुजन आघाडीने निवडणुकीविषयी याआधी साशंकता व्यक्त केली होती. त्याकडे काँग्रेसने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप वंचितने केला आहे. महाराष्ट्रातील राजकारणात वंचित बहुजन आघाडीची राजकीय ताकद कमी जरी असली तरी 'आंबेडकर' या नावाचे नेतृत्व या ठिकाणी असल्याने त्याची दखल न घेतल्याचा परिणाम काँग्रेसला देशपातळीवर भोगावा लागू शकतो. काँग्रेसवासीयांनी गांधी घराण्याच्या पलीकडे आजवर पक्षाच्या नेतृत्वाला मान्यता दिलेली नाही. याला काही अपवाद आहेत. त्याची किंमतही काँग्रेसला वेळोवेळी मोजावी लागली आहे. भाजप आणि काँग्रेसमध्ये असलेला हा फरक सत्ताधार्यांनी विशेषत: महाराष्ट्रात महायुतीने आणखी गडद केला आहे. याला काँग्रेसची 'एकाधिकारशाही' असे नाव देण्यात आणि तसे ठसवण्यात भाजपला लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतही यश आले आहे. भाजपमध्येही एकाधिकारशाही नाही असे नाही, तिथेही भाजपच्या मातृसंस्थेचे आदेश शिरसावंद्य मानलेच जातात, परंतु या आदेशांना कौटुंबिक नाही तर संस्थात्मक चेहरा असल्याचे पटवून देण्यात भाजपला यश आले आहे. मग संघटना आणि पक्षात अंतर्गत मतभेद असले तरी अशा वादांना लोकशाही म्हणून सांगण्यात भाजपने यश मिळवले आहे. काँग्रेसला हे आजपर्यंत जमलेले नाही. ही त्यांची अत्यंत कमकुवत बाजू आहे. काँग्रेसच्या आजपर्यंतच्या 'एकाधिकारशाही'ला घटना आणि लोकशाहीविरोधी ठरवण्याचे हे आयते कोलित काँग्रेसनेच वारंवार विरोधकांच्या हाती दिले आहे. त्यामुळेच निवडणूक घोटाळ्याच्या विरोधात जनचळवळ उभारण्यात काँग्रेसला यश आलेले नाही.

मागील जवळपास दीड दशकांपासून भाजपची सत्ता देशात आणि अनेक राज्यांमध्ये आहे. यातील अनेक राज्यांमध्ये भाजपवर निवडणूक यंत्रणेला 'मॅनेज' करण्याचे आरोप झालेले आहेत. परंतु असे आरोप होत असताना त्यासाठी समोर आणलेल्या पुराव्यांमध्ये त्रुटी दाखवून ते नाकारण्याचे राजकारण भाजपने याआधीही अनेकदा केलेले आहे. न्यायालयांनी दखल न घेतल्याने आपण थेट जनतेच्या न्यायालयात आता हा 'निवडणूक घोटाळा' आणल्याचा काँग्रेसचा अविर्भाव आहे. पण त्याचाही फारसा परिणाम होताना दिसत नाही. याबाबत आता विरोधकांनी विशेष करून काँग्रेसने आज म्हणजेच सोमवारी मुंबईत मोर्चा काढण्याचे ठरवले आहे, पण महाविकास आघाडीतील अंतर्गत राजकारणाचा फटका या मोर्चाला बसू शकतो. या मोर्चाचे नेतृत्व काँग्रेसच करणार हे स्पष्ट असताना प्रादेशिक पक्ष त्याला कितीशी साथ देतील हाही प्रश्न आहेच. निवडणूक आयोगावर केलेल्या आरोपांना उत्तर देण्यासाठी थेट मुख्यमंत्री फडणवीस मैदानात उतरले आहेत, तसे त्यांनी या आधीही केले होते. अशा वेळी ते सरकारचे प्रतिनिधी आहेत की, सत्ताधारी पक्षाचे नेते? हा प्रश्न लोकांच्या मनात आणखी टोकदार करणे विरोधकांना जमले नाही. देशातील राष्ट्रीय आणि जुना पक्ष असलेल्या काँग्रेसला राज्यातील प्रादेशिक पक्षांशी जुळवून घेण्यात नेहमीच अडचणी आल्या आहेत. शिवसेना, राष्ट्रवादी अशा राज्यातील प्रादेशिक पक्षांची शकले पडल्यानंतर विरोधकांचा विरोधही वारंवार दुभंगला आहे. विरोधकांमध्ये योग्य समन्वय, संवाद आणि विश्वास नसल्याचा हा परिणाम आहे. राहुल गांधींच्या बाजूने ठाकरेंची शिवसेना जरी मैदानात उतरली असली तरी विरोधकांमधील राष्ट्रवादीचा पवार गट आणि इतरांनी राहुल गांधींना समर्थन देताना महाराष्ट्रात सावध भूमिकाच घेतली आहे. त्यांच्या संदिग्ध भूमिकांवरून हे स्पष्ट व्हावे. आरोप केल्यावर आरोपातील तथ्य, वस्तुस्थिती तपासून पुरावे शोधण्याचे काम तपास, चौकशी यंत्रणांचे आहे. सत्तेवर आरोप केल्यावर आरोप करणार्यांनाच पुरावे शोधण्याचे फर्मावले जात आहे. आरोपात तथ्य नसल्याचे किंवा घोटाळा सिद्ध करणारे स्पष्ट पुरावे नसल्याचे सांगून आरोपातील वैधनिकता प्राथमिक पायरीवरच संपवल्याच्या अनेक घटना याआधी झालेल्या आहेत. त्यामुळे जरी राहुल गांधींनी कितीही पुरावे समोर मांडले तरी त्याला नाकारण्याचा अधिकार सत्तेकडे अबाधित आहे, असे असताना हे पुरावे किती खरे आहेत हे राहुल गांधींना लोकांनाच पटवून द्यायचे आहे. न्यायालय, आयोग किंवा सत्तेला नाही. त्यासाठी काँग्रेसने आपला राष्ट्रीय पक्षाचा पेहराव बाजूला ठेवून प्रादेशिक पक्षांना सोबत घेणे हिताचे आहे.

# अरुनेश्वर धाम : ५० वर्षांपूर्वी प्रकट झालेले स्वयंभू शिवलिंग

## भाविकांच्या श्रद्धेचे केंद्रस्थान




**विदर्भ प्रजासत्ताक दि.११चांदूरबाजार-** अमरावती जिल्ह्यातील चांदूरबाजार तालुक्यातील निंभोरा गावाजवळ, पूर्णा नदीच्या काठावर वसलेले अरुनेश्वर धाम हे विदर्भातील प्रमुख तीर्थक्षेत्रांपैकी एक मानले जाते. श्रावण महिन्यात तसेच वर्षभर येथे भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळते. पंचक्रोशीसह दूरवरून येणारे भक्त येथे दर्शनासाठी येतात.

### मंदिराचे वैशिष्ट्य

या मंदिरातील शिवलिंग हे जमिनीच्या १०० फूटांपेक्षा अधिक खोल आहे. विशेष म्हणजे हे शिवलिंग स्वयंभू असून मध्यभागी एक मोठे व त्याभोवती १२ लहान शिवलिंग आहेत. स्थानिक आख्यायिकेनुसार हे पवित्र स्थळ ५० वर्षांपूर्वी प्रकट झाले आहे.

१९८९ मध्ये संत बालयोगी हरिहराजी दादाजी यांच्या मार्गदर्शनाखाली गावकऱ्यांच्या मदतीने गुफेच्या बांधकामास सुरुवात झाली. आजही हे बांधकाम भाविक व ग्रामस्थांच्या देणगीतून सुरू आहे. सध्या गुहेत जाण्यासाठी तीन प्रवेशद्वारे असून, काम सुरू असल्याने मधल्या दरवाजातून भाविकांना प्रवेश दिला जातो.

### दर्शनाचा अद्वितीय मार्ग

स्वयंभू शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांना ५५ पायऱ्या उतरून, कंबरेइतक्या पाण्यातून पुढे जावे लागते. त्यानंतर आणखी १० पायऱ्या उतरल्यावर शिवलिंगाचे थेट दर्शन होते. गुहेत प्रवेश करण्यापूर्वी भक्तांसाठी आंघोळीची सुविधा उपलब्ध आहे.

### परिसरातील आकर्षण

मंदिराच्या परिसरात अनेक वर्षांपासून अखंड धुनी सुरू आहे.

एका मोठ्या झाडावर देशातील विविध राज्यांची नावे असलेले तेलाचे रिकामे डबे टांगण्यात आले असून, त्यात पक्ष्यांनी घरटी केलेली आहेत.

नियमित वृक्षारोपण व स्वच्छतेची कामे केली जातात.

### तीर्थक्षेत्राच्या दर्जाबाबत मागणी

सध्या या मंदिराला 'क' दर्जाचे तीर्थक्षेत्र म्हणून मान्यता मिळालेली आहे. मात्र, वाढती भाविकांची संख्या लक्षात घेता या ठिकाणाला 'ब' दर्जा देऊन सोयीसुविधा वाढवाव्यात, अशी मागणी भक्तांकडून करण्यात येत आहे.

श्रावणातील शिवभक्तीचा उत्साह, अद्वितीय भूमिगत शिवलिंग, निसर्गरम्य परिसर आणि सतत सुरू असलेल्या धार्मिक व सामाजिक उपक्रमांमुळे अरुनेश्वर धाम हे विदर्भातील श्रद्धास्थान म्हणून अधिकाधिक लोकप्रिय होत आहे.




# 'वॉकिंग' सोपा पण परिणामकारक निरोगी आरोग्याचा मंत्र

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक**

व्यस्त आणि तणावग्रस्त जीवनशैलीत आरोग्याची काळजी घेणं ही एक मोठी गरज झाली आहे. पण अनेकांना जिम, योगा किंवा इतर कठीण व्यायामप्रकारासाठी वेळ मिळत नाही. अशा वेळी 'दररोज चालणे' म्हणजेच वॉकिंग हा सर्वात सोपा, स्वस्त आणि प्रभावी व्यायाम ठरू शकतो.

वॉकिंग ही केवळ हालचाल नाही, तर शरीर आणि मन दोन्हींसाठी एक प्रकारची थेरपी आहे. नियमित चालण्यामुळे शरीराच्या विविध भागांना बळकटी मिळते, हृदयाचे आरोग्य सुधारते आणि मानसिक तणाव दूर होतो.

**वॉकिंग का आहे व्यायामासारखे?**

१.हृदयाला बळकटी: चालताना हृदयाची गती वाढते, ज्यामुळे रक्तप्रवाह सुधारतो आणि हृदय निरोगी राहते.

२.वजन नियंत्रण: रोज चालल्याने कॅलरीज जळतात, ज्यामुळे वजन नियंत्रणात राहते.

३.मांसपेशी मजबूत: विशेषतः पाय, मांडी आणि कंबरेच्या स्नायूंना बळकटी मिळते.

४.तणाव कमी: सकाळी किंवा संध्याकाळी चालणे मनाला शांत करते आणि चिंता कमी करते.

५.डायबिटीज व बीपी नियंत्रण: नियमित चालल्याने साखरेचे प्रमाण आणि रक्तदाब संतुलित राहतो.

६.पचन सुधारते: जेवणानंतरची हलकी वॉक




पचनक्रिया सुधारते आणि पोटाच्या तक्रारी कमी करते.

**प्रभावी वॉकिंगसाठी काही टिप्स:**

१) दररोज किमान ३० मिनिटे चालण्याचा प्रयत्न करा.

२) चालताना थोडासा श्वास वाढेल अशा वेगाने (ब्रीझ्झ थरश्रज्ञ) चालणे फायदेशीर ठरते.

३) आठवड्यात किमान ५ दिवस वॉकिंग करा.

४) शक्यतो ताजी हवा आणि हिरवळ असलेल्या ठिकाणी चालणे अधिक आरोग्यदायी असते.

आजच्या काळात तंदुरुस्ती टिकवण्यासाठी महागड्या साधनसामग्रीची किंवा विशेष ट्रेनिंगची गरज नाही. दररोजची चाल ही केवळ व्यायाम नाही, तर दीर्घकाळ आरोग्य टिकवण्याची हमी आहे.

# पिक संरक्षणासाठी करा हे उपाय; वाचा कृषी सल्ला सविस्तर

**दि.११ विदर्भ प्रजासत्ताक**

शेतकरी बांधवांनी आपल्या पिकांचे, फळबागांचे आणि भाजीपाल्याचे संरक्षण करण्यासाठी त्वरित कृषी उपाययोजना करणे गरजेचे आहे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने दिलेल्या कृषी हवामान सल्ल्यानुसार जाणून घ्या, कोणते उपाय तातडीने करावेत.प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबईच्या अंदाजानुसार मराठवाड्यात पुढील काही दिवस पावसाची हजेरी राहणार आहे.१० ते १२ ऑगस्टदरम्यान मराठवाड्यातील काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे.(र्घीीहळ डरश्रश्र)

**विस्तारीत हवामान अंदाज**

८ ते १४ ऑगस्ट : पाऊस सरासरीएवढा ते जास्त, तापमान सामान्यपेक्षा थोडे जास्त.

१५ ते २१ ऑगस्ट : पाऊस सरासरीएवढा ते जास्त, कमाल तापमान किंचित कमी, किमान तापमान सामान्यपेक्षा जास्त.

**पीक व्यवस्थापन सल्ला**

**सोयाबीन-** तणनियंत्रणासाठी अंतरमशागती करा.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

पाने खाणाऱ्या अळीवर ५ टक्के निंबोळी अर्क किंवा शिफारस केलेले कीटकनाशक पावसाची उघडीप बघून फवारावे.

पांढरी माशी आढळल्यास पिवळे चिकट सापळे लावा आणि पिवळा मोझॅकग्रस्त झाडे काढून नष्ट करा.

**खरीप ज्वारी व बाजरी**

जमिनीत वापसा असताना अंतरमशागती करून तणनियंत्रण करा.

लष्करी अळीवर इमामेक्टीन बेन्झोएट किंवा स्पिनेटोरम आलटून-पालटून फवारणी करा.

**ऊस-** पांढरी माशी व पाकोळीवर जैविक बुरशी लिकॅनीसिलियम लिकॅनी किंवा शिफारस केलेले कीटकनाशक वापरा.

पोक्का बोइंग रोगावर कार्बेन्डाझिम + मॅन्कोझेब किंवा कॉपर ऑक्सीक्लोराइड फवारणी करा.

**हळद-** २५ किलो नत्र व सूक्ष्मअन्नद्रव्य विभागून द्यावे.

पानावरील ठिपके व करपा रोगावर कार्बेन्डाझिम + मॅन्कोझेब फवारणी करा.

कंदमाशीवर क्विनालफॉस किंवा डायमिथोएट आलटून-पालटून फवारणी करा.



शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

**फळबाग व्यवस्थापन**

संत्रा/मोसंबी : १९:१९:१९ खत फवारावे, रोगावर कॉपर ऑक्सीक्लोराइड वापरावे.

डाळींब : खत सूक्ष्मसिंचनाद्वारे द्या, अतिरिक्त फुटवे काढा.

**भाजीपाला-** काढणीस तयार पिके वेळेवर काढा.

डाऊनी मिल्ड्यू, शेंडा व फळ पोखरणारी अळी, पावडरी मिल्ड्यू रोगावर शिफारस केलेली फवारणी पावसाची उघाड बघून करा.

**फुलशेती-** काढणीस तयार फुलपिकांची वेळेवर काढणी करा.

अंतरमशागती करून तणमुक्त ठेवा.

**पशुधन-** पावसाळ्यात कोंबडी व शेळ्यांना वेळेवर लसीकरण करा.निवारा स्वच्छ व जैवसुरक्षा मर्यादेत ठेवा.मराठवाड्यात मुसळधार पावसाची शक्यता असल्यामुळे शेतात, फळबागेत, भाजीपाला व फुल पिकात पाणी साचणार नाही, याची काळजी घ्या व अतिरिक्त पाण्याचा निचरा करा.

# दर्यापूर येथे संत शिरोमणी सेना महाराज विशेषांक 'रिंगण' प्रकाशन सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताकदि. ११ दर्यापूर, १०**दर्यापूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कृषी भवन, अकोट रोड येथे येत्या १३ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता संत शिरोमणी सेना महाराज विशेषांक 'रिंगण' प्रकाशन सोहळा पार पडणार आहे. संत सेना महाराज प्रतिष्ठान, दर्यापूर व विविध सामाजिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा होणार आहे.कार्यक्रमात श्री. सचिन परब यांचे व्याख्यान होणार असून, 'संत सेना महाराज राष्ट्रीय प्रभाव' या विषयावर ह.भ.प. स्वामी राज महाराज भिसे यांचेही मार्गदर्शन होईल.कार्यक्रमाचे अध्यक्ष




तहसीलदार डॉ. रवींद्र कानडे असतील. प्रमुख पाहुणे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती सुनील गावंडे, सुभाष मानेकर, गजानन अंजनकर, जयेश महानकर, विजय विल्हेकर, प्रा. संगीता पातुर्डे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.आयोजनात श्री. रमेश दहीहंडकर, बंडूभाऊ आंबुसकर, रामेश्वर उन्नतकर, रविभाऊ कळसकर, गणेश उगडकर, विजय अंबुलकर आदी सामाजिक कार्यकर्त्यांचा सहभाग आहे. कार्यक्रमाला उपस्थित राहून शोभा वाढवावी, असे आवाहन रामेश्वर मालपाणी, सुभाष वडुळकर, गजानन देवके, सदानंद तिडके, मनोज रेखे, मालिनी पाटील रेखे, वर्षा अग्रवाल, सुनिता मडवे व अन्य मान्यवरांनी केले आहे.

# उद्याला पार पडणार महावितरणचा दुसरा ऊर्जामित्र दिन

## वीज ग्राहकाच्या तक्रारीचे होणार निराकरणसहभागी होण्याचे महावितरणचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती-** वीज ग्राहकांच्या वीज सेवेशी संबंधित तक्रारी सोडविण्यासाठी मंगळवार दिनांक १२ ऑगष्ट ला महावितरणच्या २३ उपविभागात ऊर्जामित्र दिनाचेआयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ ते १२ वाजे दरम्यान आयोजित या दिनाचा जिल्ह्यातील जास्तित जास्त वीज ग्राहकांनी लाभ घेवून आपल्या तक्रारीचे निराकरऩ करून घेण्याचे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे.लोकशाही दिनाच्या धर्तीवर आयोजित महावितरणचे ऊर्जामित्र दिन प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी महावितरणच्या सर्व उपविभागांमध्ये उपकार्यकारी अभियंता यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित केला जात आहे. या दिवशी महावितरणचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा थेट ग्राहकांशी संवाद होईल, वीज पुरवठ्याशी संबंधित ग्राहकांच्या तक्रारी, सूचना , अपेक्षा आणि अभिप्राय स्विकारल्या जाईल आणि ते निवारण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. तथापि प्रथम या अगोदर पार पडलेल्या ऊर्जामित्र दिनातील तक्रारींचा लेखाजोगा घेतल्या जाणार आहे. परिमंडळात महावितरणचे ४१ उपविभाग आहेत.त्यापैकी अमरावती २३ आणि यवतमाळ जिल्ह्यात १८ उपविभाग आहेत. या उपक्रमाच्या आयोजनात दखल घेतल्या जाणार




ग्राहकांची सोय बघतल्या गेली असून ऊर्जामित्र दिनाचे आयोजन त्या दिवसी सकाळी ११ ते १२ वाजेदरम्यान ४१ उपविभागीय कार्यालयात करण्यात येणार आहे. तथापि प्राप्त सर्व तक्रारी ऐकून घेत त्या तक्रारीची आहे.ऊर्जामित्र दिनामुळे ग्राहक आणि महावितरण यांच्यातील संवाद अधिक खुला व विश्वासार्ह होईल, तसेच सेवा सुधारण्यास हातभार लागेल. उपक्रमाची अमंलबजावणी यशस्वी होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, ग्राहक प्रतिनिधी, वीज ग्राहक यांचा सक्रीय सहभाग अपेक्षित असून ऊर्जामित्र दिन ही एक अभिनव संकल्पना ठरणार आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. ११ ऑगस्ट २०२५

शहर/ग्रामिण

# महावितरणच्या जरीदा उपकेंद्रामुळे ५० गावाचा विजेचा प्रश्न सुटला

## सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश भुषण गवई यांचे विशेष प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती–**
महावितरणच्या ३३ केव्ही जारीदा (चिखलदरा) उपकेंद्राला वन विभागाची अंतिम मंजूरी मिळाली आहे. त्यामुळे जारीदा आणि परिसरातील ५० गावांना सुरळीत वीज पुरवठा मिळणार आहे. त्यामुळे विजेशी संबंधित समस्यांचे कायमस्वरूपी निराकरणही होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश भुषण गवई यांच्या विशेष प्रयत्नामुळे जारीदा उपकेंद्राच्या मार्गातील सर्व अडथळे दूर झाले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली. मेळघाटातील अतिदुर्गम व आदिवासी बहुल वन क्षेत्रामधील जारीदा वितरण केंद्रांतर्गत वीज पुरवठा होणाऱ्या ५० गावांना अखंडित आणि दर्जेदार वीज पुरवठा करण्यासाठी जिल्हा विकास निधीतील आदिवासी उपयोजनेंतर्गत ९ कोटी ३३ लाख ९४ हजार खर्च करून जारीदा येथे नविन ३३ केव्ही उपकेंद्र उभारण्यात आले आहे.५ एमव्हीए क्षमता असलेल्या या उपकेंद्राला ३३ केव्ही वाहिनीव्दारे २२० केव्ही कोयलारी (मध्य प्रदेश) उपकेंद्रातून वीज पुरवठा करण्यात येणार आहे. उपकेंद्राचे काम ऑक्टोबर २०२३ ला पुर्ण झाले आहे. परंतु ३३ केव्ही उपकेंद्र व वाहिनीचा काही भाग वन्य जीव संरक्षण कायदा आणि वन संरक्षण कायदा अंतर्गत येत असल्याने मंजूरीकरीता प्रस्ताव वन खात्याकडे पाठविण्यात आला. त्यांनतर महावितरण



सोबत तत्कालिन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यामार्फतही नियमित आढावा आणि सर्व लोकप्रतिनिधींनी सातत्याने पाठपुरावा केला.मेळघाटातील दुर्गम, अतिदुर्गम भागातील आदिवासीबहुल भागांना सुरळीत आणि दर्जेदार वीज पुरवठा करण्यासंदर्भात महावितरण आणि जिल्हा प्रशासन कायम आग्रही राहीले आहे. गेली चार वर्षे प्रलंबित असलेल्या या प्रस्तावाला मंजुरी मिळण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधींनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्यानंतर ३३ केव्ही जारीदा उपकेंद्राला या अगोदर राष्ट्रीय वन्य जीव बोर्डाच्या स्थायी समितीच्या बैठकीत दिल्ली येथे १२ मार्च २०२५ आणि पर्यावरण मंत्रालय सल्लागार समितीच्या दिल्ली येथील बैठकीत वन संरक्षण कायदा अंतर्गत १६ एप्रिल २०२५ ला ३३ केव्ही जारीदा उपकेंद्राच्या प्रस्तावाला मंजूरी मिळाली होती. यानंतर वन्य जीव विभागाने दि. १४ जुलै २०२५ ला काम सुरू करण्याची मान्यता प्रदान केली. पर्यावरण मंत्रालयाकडून दि. ६ ऑगस्ट २०२५ अंतिम मान्यता मिळाली आहे. यामुळे जरीदा उपकेंद्रातील ५० गावांमध्ये नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश भुषण गवई आणि प्रशासनाच्या प्रयत्नामुळे वन विभागाची अंतिम मान्यता मिळाल्याने महावितरणच्या ३३ केव्ही जारीदा उपकेंद्र कार्यान्वित करण्यामधील मुख्य अडथळा दूर झाला आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी दिली.

# क्रीडा क्षेत्राला निधी देऊन आंतरराष्ट्रीय क्रीडापटू घडविणार

## – पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती–**
बदलत्या काळानुसार मातीवरील कुस्ती आता मॅटवर खेळायला सुरुवात झाली आहे. मातीवरील कुस्तीला महत्त्व असले, तरी आंतरराष्ट्रीय स्तरावर मॅटवरील कुस्तीला महत्त्व आहे. त्यामुळे येत्या काळात आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविण्यासाठी क्रीडा क्षेत्राला पुरेपूर निधी घेऊन सक्षम करण्यात येईल, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.



विभागीय क्रीडा संकुलात आज कुस्ती मॅट आणि इतर क्रीडा साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, रवी राणा, राजेश वानखेडे, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, अमरावतीला पुण्याशी जोडण्यासाठी वंदे भारत रेल्वे सुरू करण्यात आली आहे. हा विकसित भारताला संकल्प राहणार आहे. येत्या काळात विमानानेही पुण्याला जोडण्याचा प्रयत्न राहणार आहे. आज शेकडो खेळाडू पुण्याशी जोडल्या गेले आहे. त्यामुळे या दोन शहरादरम्यान वाहतुकीची गतिमान सुविधा होणे गरजेचे आहे. आज भारतात प्रत्येक क्षेत्रात इतिहास घडवत असून क्रीडाक्षेत्रही मागे राहिले नाही. त्यामुळे दर्जेदार क्रीडा सोयीसुविधा उपलब्ध करून अमरावतीला क्रीडा क्षेत्रात न्यायचे पुढे आहे.

जागतिक बुद्धिबळमध्ये १९ वर्षीय दिव्या देशमुख यांनी इतिहास घडवला आहे. ती भारताची ८८ ग्रॅण्डमास्टर ठरली आहे. अशा प्रकारचा इतिहास अमरावतीमध्ये घडवणे गरजेचे आहे. महाराष्ट्र केसरीमुळे कुस्तीला महत्त्व आले असून ऑलम्पिक स्पर्धांमध्येही हा खेळ गेला आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर कुस्तीगीर घडत आहे. विभागीय क्रीडा संकुलाच्या दुरुस्तीसाठी आवश्यक असलेला निधी देण्यात येईल. तसेच येत्या काळात व्यायाम शाळेसाठी १५ लाख, व्यायाम शाळा बांधकामासाठी १५ लाख आणि क्रीडांगण दुरुस्तीसाठी २५ लाख रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. तसेच इको टुरिझममधून एका ठिकाणच्या कामासाठी ३० कोटींचा निधी देण्यात येणार आहे. त्यामुळे विदर्भाचे नंदनवन असलेल्या चिखलदरा येथे कोलकाससह चार कामे प्रस्तावित करण्यात आली आहे.यावेळी ज्येष्ठ क्रीडापटूंच्या सत्कार करण्यात आला. तसेच खेळाडूंना क्रीडा साहित्याची वाटप करण्यात आले. कुस्तीगीर परिषदेतर्फे पालकमंत्री यांना चांदीची गदा देऊन सत्कार करण्यात आला. जिल्हा क्रीडा अधिकारीग णेश जाधव यांनी प्रास्ताविक केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ९४ लाख रुपये किमतीचे क्रीडा साहित्य वाटप करण्यात आले.

# जन्म दिला तिने, नाव घेतले दुसरीने – राजापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**
शहरातील एका खासगी रुणालयात एका महिलेने मुलीला जन्म दिला. मुलगी सहा महिन्याची झाल्यानंतर महिलेच्या नातेवाईकांनीच मुलगी त्यांची असल्याचा दावा केल्यामुळे जन्म देणाऱ्या आईच्या पायाखालची वाळू सरकली. तिने तत्काळ राजापेठ ठाण्यात धाव घेतली आणि घडलेला सर्व प्रकार पोलिसांना सांगितला. अखेर तांत्रिक पेचात पडलेल्या प्रकरणात पोलिसांनी मुलीचा दावा करणाऱ्या दाम्पत्याविरुध्द अपहरणाचा गुन्हा दाखल करुन तपास सुरु केला.राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका ३४ वर्षीय गर्भवती महिलेचा शहरातील एका स्त्रीरोग तज्ज्ञांकडे उपचार सुरु होता. ६ ते ७ महिने उपचार घेतल्यानंतर महिलेच्या नणंदीने तिला साईनगरातील एका खासगी रुग्णालयात उपचार घ्यायला सांगितले. त्यामुळे महिलेने साईनगरातील खासगी रुग्णालयात उपचार घेतला. त्यानंतर १७ फेब्रुवारी २०२५ रोजी महिलेची डॉ. मोनाली कळंबे- बोडे यांच्या रुग्णालयात प्रसुती झाली. तिने एका मुलीला जन्म दिला. मुलगी सहा महिन्यांची झाल्यानंतर दुसऱ्या जिल्ह्यात राहणारी महिलेची नातेवाईक अमरावतीत आली. सहा महिन्यांच्या मुलीला सोबत आठ दिवसांकरिता घेऊन जाते, असे सांगून ती चिमुकलीला घेऊन गेली. आठ दिवस झाले तरी नातेवाईकांनी मुलीला परत आणले नाही. त्यामुळे मुलीच्या आईने त्यांना मुलीला आणून



देण्यासाठी फोन केला. संबंधित महिलेने फोन रिसिव्ह केला नाही. त्यामुळे जन्म देणाऱ्या आईपासून चिमुकली दूर राहिली. अखेर मुलीची आई तिच्या पतीसह तीन महिने दूर काही दिवसांपूर्वी मुलीला आणण्याकरिता महिलेच्या घरी गेली. परंतु तिने मुलगी परत न करता वाद घातला. तसेच नजिकच्या पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तक्रार दिल्याची माहिती मिळताच जन्मदात्या बाळाची आई-वडिलांनी तत्काळ संबंधित ठाण्यात पोहोचले. विचारपुस केली असता ज्या महिलेने बाळाचे अपहरण केले त्या महिलेच्या पतीचे नाव मुलीच्या नावासमोर लावल्याचा कागद दाखविला. तसेच जन्माला आलेल्या मुलीचे आधारकार्डसुद्धा त्याच नावाने केले होते. हे पाहताच जन्म देणाऱ्या महिलेसह तिच्या पतीच्या पायाखालची वाळू सरकली. तेव्हा लगेच त्यांनी राजापेठ पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि घडलेला सर्व प्रकार सांगितला. तसेच गरोदरपणाच्या काळात संशयित महिला नातेवाइकाने स्वतःच्या नावाने दस्तऐवज तयार करून मुलीचे आधारकार्ड व जन्मप्रमाणपत्र तयार करून तिला बळजबरीने ताब्यात ठेवले, असा आरोप राजापेठ ठाण्यात दाखल तक्रारीत केला आहे.

# एसटीमध्ये विनातिकीट प्रवास करणाऱ्या १८७ प्रवाशांकडून दंड वसूल

## ४१ प्रकरणात वाहकांकडून तिकीट न दिल्याचे उघड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती–** एसटी बसमध्ये विनातिकीट प्रवाशांच्या धरपकड मोहिमेत एसटी महामंडळाच्या पथकाने मागील सहा महिन्यात १८७ प्रवाशांना विनातिकीट प्रवास करतांना पकडले. त्यांच्याकडून १३ हजार ६८१ रुपये दंड वसुल केला. तसेच ४१ प्रकरणात वाहकाने प्रवाशांना तिकीटच दिले नाही, असे उघड झाले असून संबंधित वाहकांची महामंडळाचे अधिकारी चौकशी करीत आहेत.



एसटी बसमधून काही जण फुकटात प्रवास करत असल्याचे एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या लक्षात येताच त्यांनी जानेवारी ते जुले या सहा महिन्यात जिल्ह्यात सहा तपासणी पथकाच्या माध्यमातून विविध तालुक्यांतील बसगाड्यांमध्ये तपासणी केली. एसटी मोहिमेदरम्यान अनेकांनी जाणूनबुजून तिकीट न काढता प्रवास केला, तर काहींनी सवलतीचा गैरफायदा घेत फुकट प्रवास केला. याच दरम्यान आणखी एक गंभीर बाब उघडकीस आली आहे की, ४१ प्रकरणांमध्ये वाहकांनी प्रवाशांकडून पैसे घेतले. मात्र त्यांना तिकीटच दिले नाही.

### वाहकांवरही शिस्तभंगाची कारवाई

काही प्रकरणात वाहक तिकीट न देता प्रवाशांकडून पैसे घेतात असे प्रकार तपासणी पथकांच्या कारवाईतून उघड झाले आहेत. अशा प्रकरणांमध्ये वाहकांवर निलंबनाची, वेतन कपातीची किंवा सेवेतून बडतर्फ करण्याचीही कारवाई केली जाते.

**निलेश बेलसरे**– विभागीय वाहतूक नियंत्रक, अमरावती एसटी महामंडळ–

# अमरावती पोलीस आयुक्तालयातील तिन्ही पोलीस स्टेशनच्या घरभाडे भत्त्यात कपात

## पोलीस परिवार आर्थिक संकटात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती–** अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील वलगाव, नांदगाव पेठ आणि भातकुली या तिन्ही पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या घरभाडे भत्त्यात तब्बल साडेचार ते पाच हजार रुपयांची कपात करण्यात आली आहे. या निर्णयामुळे पोलीस कर्मचाऱ्यांचे मासिक अर्थकारण विस्कळीत झाले असून, विशेषतः पोलीस पत्नींच्या घरगुती बजेटवर मोठा आर्थिक फटका बसला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अमरावती आयुक्तालयातील इतर पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना




पूर्ण घरभाडे भत्ता दिला जातो. मात्र वलगाव, नांदगाव पेठ व भातकुली या तीन पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांना तुलनेने कमी भत्ता मिळत असल्याने असमानता निर्माण झाली आहे. या भागात राहण्यासाठी व घरभाडे भागवण्यासाठी लागणारा खर्च मोठा असल्याने, भत्त्यातील ही कपात कर्मचाऱ्यांच्या खिशाला चांगलीच चाट बसवत आहे.याशिवाय, या तीनही पोलीस स्टेशनच्या परिसरात इतर मूलभूत सुविधा अपुऱ्या असल्याने, येथे बदली झालेल्या अधिकारी व कर्मचारी रुजू होण्यास टाळाटाळ करतात. यामुळे कार्यक्षमतेवरही परिणाम होत असल्याचे बोलले जात आहे.या पार्श्वभूमीवर, वलगाव, नांदगाव पेठ आणि भातकुली येथील पोलीस पत्नी संघटनेने थेट राज्याचे गृहमंत्री यांना निवेदन देऊन, सर्व पोलीस स्टेशनप्रमाणे समान घरभाडे भत्ता मिळावा, तसेच इतर सुविधा पुरवाव्यात, अशी मागणी केली आहे. गृहमंत्र्यांनी याबाबत सकारात्मक भूमिका घेऊन त्वरित तोडगा काढावा, अशी अपेक्षा पोलीस परिवाराने व्यक्त केली आहे.

# वंदे भारत एक्सप्रेसचे बडनेरा रेल्वे स्थानकावर उत्साहात स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती–**
अजनी-पुणे वंदे भारत एक्सप्रेसचे बडनेरा रेल्वे स्टेशनवर उत्साहात स्वागत करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी हिरवी झेंडी दाखवून रेल्वेला रवाना केले.

नागपूर येथून निघालेल्या वंदे भारत एक्सप्रेसच्या स्वागतासाठी बडनेरा रेल्वे स्टेशनवर खासदार डॉ. अनिल बोंडे, बळवंत वानखेडे, आमदार रवी राणा, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्यासह रेल्वेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

बडनेरा रेल्वे स्टेशनवर विदर्भासाठी असलेल्या पहिल्या वंदे भारत एक्सप्रेसचे आगमन झाल्यानंतर उत्साहात स्वागत करण्यात आले. हारफुलांनी सजलेल्या रेल्वेने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. उपस्थित मान्यवरांनी प्लॅटफॉर्म क्रमांक दोन वर आलेल्या वंदे भारत एक्सप्रेसला हिरवी झेंडी





दाखविली. यावेळी झालेल्या कार्यक्रमात खासदार डॉ. बोंडे म्हणाले, विदर्भात वंदे एक्सप्रेसचे स्वागत होत आहे. पुणे येथे जाणाऱ्या चाकरमाण्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता. या रेल्वेमुळे प्रवाशांची सोय झाली आहे. वंदे भारत एक्सप्रेसमुळे सुरक्षित आणि सुसज्ज असा प्रवास होणार आहे. या एक्सप्रेसला शेगाव येथे थांबा मिळाला आहे, ही आनंदाची बाब आहे. येत्या काळातही सोयीचा आणि गतिमान प्रवास होणार यासाठी प्रयत्न करण्यात येतील.खासदार श्री. वानखेडे म्हणाले, वंदे भारतची दुपारची वेळ प्रवाशांच्या सोयीची नाही. सायंकाळची वेळ असल्यास त्याचा प्रवाशांना फायदा होईल. त्यामुळे येत्या काळात रेल्वेचा वेळ बदलण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल, असे सांगितले.

# ओबीसींचा मतांच्या राजकारणासाठी वापर

## मुख्यमंत्री फडणवीस यांची मंडल यात्रेवर टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११नागपूर** – वर्षानुवर्षे ज्यांनी ओबीसी समाजाला पाण्यात पाहिले, त्यांना आता हा समाज आठवला आहे. ज्यांनी ओबीसी समाजाचा केवळ भाषणापुरता आणि मतांच्या राजकारणाचा वापर केला त्यांना ओबीसींनीच शक्ती काय असते, हे दाखवून दिले आहे. हे लक्षात आल्यानेच यात्रेवरून नवे 'सोंग' सुरू आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी मंडल यात्रेवर निशाणा साधला.



नागपूर पोलिसांनी विकसित केलेल्या 'गरुड दृष्टी' या 'सोशल मीडिया मॉनिटरिंग' साधनाच्या सादरीकरणाचे अवलोकन आणि सायबर फसवणुकीत बळी पडलेल्यांना १० कोटी रकमेच्या परताव्याचे वितरण करण्यासाठी पोलीस मुख्यालयात आले असता त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

मुख्यमंत्री म्हणाले, आजवर ज्यांनी ओबीसी समाजाचा केवळ मतांच्या राजकारणासाठी वापर केला त्यांना आता समाज दुरावल्याचे लक्षात आल्यावर मंडल यात्रा सुचली आहे. नुसती यात्रा काढून चालणार नाही तर ओबीसींच्या पाठीशी ठाम उभे आहात हे कधीतरी दिसू द्या, असे फडणवीस म्हणाले.

### तक्रार का केली नाही?

शरद पवार यांनी नागपुरात विधानसभा निवडणुकीआधी दोन माणसे भेटायला आली होती. त्यांनी २८८ जागांपैकी १६० जागा निवडून आणण्याची गॅरंटी दिली होती, असा गौप्यस्फोट शनिवारी केला होता. त्याविषयी मुख्यमंत्री म्हणाले, ही 'सलीम-जावेद'ची कथा सुरू आहे. तुम्ही जबाबदार नागरिक आहात. अशाप्रकारे तुमच्याकडे कोणी आले तर तुम्ही पोलीस अथवा निवडणूक आयोगाला तक्रार का केली नाही. तुम्ही त्यांचा वापर करण्याचा प्रयत्न करून बघितला का? या सगळ्या गोष्टी थोतांड आहेत, असे फडणवीस म्हणाले.ज्यावेळी ओबीसींवर संकट येते त्या-त्या वेळी तुमची भूमिका 'नरो वा कुंजरो वा' सारखी असते. हे ओबीसींनी पाहिले आहे. तरीही तुम्हाला ओबीसींची आठवण आली

असेल, तर ती कृतीतही दिसेल, अशी अपेक्षा करतो.

**-देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री.**

# 'शरद पवार, उद्धव ठाकरेंकडे मांत्रिक, तांत्रिक गेले असतील'

## -खासदार डॉ. अनिल बोंडेंची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती-** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि शिवसेना नेते संजय राऊत जे बोलले, ते हास्यास्पदही आहे आणि खरेही आहे. जेव्हा निवडणुका होतात, त्यावेळी अनेकांकडे मांत्रिक, तांत्रिकही येतात. आम्ही मंत्राद्वारे मतदार संघ बांधून देऊ, मतदान यंत्रे बांधून देऊ, आम्ही मतदारांवर प्रभाव टाकून देऊ, असा दावा ते करतात. हेच लोक शरद पवार, उद्धव ठाकरेंकडे गेले असतील, अशी टीका भाजपचे राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी येथे पत्रकारांशी बोलताना केली.

डॉ. बोंडे म्हणाले, निवडणूक काळात पैसे कमावणाऱ्या लोकांच्या टोळ्या फिरत असतात. शरद पवार यांचे तर राजकारणात संपूर्ण आयुष्य गेले आहे. त्यांच्याकडे तर मंत्र, तंत्राने बांधणारे, मतदान यंत्र हॅक करून देऊ, असे दावा करणारेही लोक आले असतील. पण, खरे तर जागरूक नेत्यांनी त्या लोकांची तत्काळ पोलिसांकडे तक्रार करणे आवश्यक होते. कारण अशी फसवेगिरी करणारे जे भामटे असतात, त्या भामट्यांना पकडणे हे खरे नेत्याचे काम आहे. पण, तेव्हा त्यांनी काहीच सांगितले नाही आणि आता दहा महिन्यानंतर राहुल गांधी यांच्या खोट्या आरोपांवर हो ला हो करण्यासाठी शरद पवार वक्तव्य देत आहेत.



डॉ. अनिल बोंडे म्हणाले, खऱ्या अर्थाने संजय राऊत यांना काहीही काम नाही. रात्री जेव्हा ते बसतात, त्यावेळी त्यांच्या डोक्यात ज्या कल्पना येतात. जे मनात विचार येतात, ते विचार सकाळी नऊ वाजताच्या भोंग्यातून समोर काढतात. त्यावर प्रसार माध्यमांमध्ये चर्चा केली जाते. रात्रीचे इफेक्ट हे सकाळी दिसतात. डॉ. अनिल बोंडे म्हणाले, मतदार याद्यांमध्ये ज्या चुका होतात, त्या दुरूस्त करण्यासाठी मतदार याद्यांच्या विशेष सखोल पडताळणी म्हणजेच एसआयआरची तरतूद निवडणूक आयोगाने केली आहे.

राहुल गांधी एकीकडे म्हणतात, की महाराष्ट्रामध्ये मते वाढली. दुसरीकडे, मतदार याद्यांचे पुनर्निरीक्षण पण व्हायला नको, असेही ते सांगतात. एसआयआर पाठीमागे घ्या, अशी मागणी ते करतात. नेमके त्यांना काय पाहिजे आहे, हेच अजून स्पष्ट झालेले नाही. याच गोंधळात राहुल गांधी आणि काँग्रेस पक्ष असल्याचे बोंडे म्हणालेत.

# 'आताच मतदार यादीवर आक्षेप नोंदवा' भाजप, महायुती ५१ टक्के मतांनी जिंकणार -बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती-**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे सध्या 'खोटे बोला, रेटून बोला' हेच काम सुरू आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेमध्ये प्रत्येक पक्षाचे बुथ पातळीवरील एजंट असतात. जेंव्हा तुम्हाला मतदार यादीवर आक्षेप घेण्याची वेळ होती, तेंव्हा तुम्ही ते घेतले नाहीत. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महाविकास आघाडी भूईसपाट होणार आहे.

आजही संधी आहे. आता मतदार याद्या पाहण्याची वेळ आली आहे. आताच मतदार यादी पुन्हा बघून घ्या, आताच आक्षेप घेऊन टाका, नाहीतर निवडणूक हरल्यावर पुन्हा म्हणतील की मतदार यादी चुकीची होती, अशी टीका महसूल मंत्री आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी येथे पत्रकारांशी बोलताना केली.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, काँग्रेसचे नेते आता खोटे बोलत आहे. बाळासाहेब थोरात निवडणूक हरले, त्यांनी आक्षेप नोंदवला नाही. नाना पटोले फक्त दोनशे मतांनी जिंकले, त्यांनीही आक्षेप घेतला नाही. पूर्ण निवडणूक प्रक्रिया आटोपली, तुमचे आक्षेप नाहीत. आपल्या राज्यात एक लाख बुथ आहे. यापैकी कोणत्या एका तरी बुथवर



काँग्रेसच्या नेत्यांनी आक्षेप घेतला का, मतदान झाल्यानंतर जेंव्हा मतदान यंत्रे सील केली जातात, तेंव्हा कुणी आक्षेप नोंदवले का, एक लाख बुथवरील मतदान प्रक्रियेवर आक्षेप घेतले का, आता निवडणुका झाल्यानंतर तुम्ही निवडणूक हरले.

आताही निवडणुकीत पराभूत झाल्यावर काय सांगतील की मतदार यादीत गडबड होणार आहे. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या वेळी २ कोटी ५० लाख मते मिळाली, ३१ खासदार जिंकले, तेव्हा मतदार यादी बरोबर होती. तेंव्हा मतदान यंत्रे बरोबर होती आणि भाजप जिंकली, तर यंत्रे खराब झाली. मतदार यादी खराब झाली, हे उद्योग थांबले पाहिजेत. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महाविकास आघाडी भूईसपाट होणार असल्याचे बावनकुळे म्हणालेत.

# नागपूर-पुणे 'वंदे भारत'च्या प्रवासभाड्याची स्पर्धा चक्क विमानासोबत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११बडनेरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रविवारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे नागपूर-पुणे वंदे भारत एक्सप्रेसचा हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला. या निमित्ताने येथील मध्यवर्ती रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक आठवर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कृष्णा खोपडे, आमदार मोहन मते, प्रवीण दटके, मध्य रेल्वेचे महाप्रबंधक धर्मवीर मीणा, विभागीय रेल्वे व्यवस्थापक विनायक गर्ग यांच्यासह मध्य रेल्वेचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. पंतप्रधानांनी दूरदृश्य संवादप्रणालीद्वारे आज अजनी(नागपूर) -पुणे गाडीला हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ केले. तसेच याच कार्यक्रमात बेंगळुरू-बेळगाव आणि कटरा-अमृतसर वंदे भारत एक्सप्रेस या गाड्यांचाही शुभारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला.



या गाडीचे एक्झिक्युटिव्ह चेअर कारचे ३८१५ रुपये आहे. तर चेअर कारचे भाडे २१४० रुपये आहे. यामध्ये भोजन सुविधा उपलब्ध आहे. भोजन सुविधा नको असल्यास प्रवास भाड्यातून ५४५ रुपये कमी होते.देशातील रेल्वे मार्गांचा विकास म्हणजे विकसित भारताला आधुनिक आणि गतिमान प्रवास सुविधांची भेट असून या वंदे भारत एक्सप्रेसमुळे पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील धार्मिक स्थळांपर्यंतचा प्रवास आता सुलभ आणि गतिमान होणार आहे. या सुविधेमुळे स्थानिकांना व्यापार, पर्यटन आणि रोजगाराच्या संधींची उपलब्धता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.

### असे असेल प्रवासभाडे

अजनी-पुणे वंदे भारत एक्सप्रेसचे चेअरकारचे प्रवास भाडे दोन हजार १४० रुपये आहे. यामध्ये प्रवाशाला भोजन उपलब्ध केले जाणार आहे. भोजन नको असल्यास यातील ५४५ रुपये कमी केले जाईल. म्हणजे नागपूरहून पुण्याला जाण्यासाठी एक हजार ५९५ रुपये मोजावे लागतील.

# पुलावरून पाणी वाहत असल्याने दगडागड गावाचा संपर्क तुटला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११भातकुली-**

भातकुली तालुक्यातील बैलमारखेडा गट ग्रामपंचायत अंतर्गत येणारे सुमारे ५० लोकसंख्या असलेले दगडागड हे गाव अजूनही नागरी सुविधांपासून वंचित आहे.१० ऑगस्ट रोजी दुपारी सुमारे ४ वाजताच्या सुमारास झालेल्या दमदार पावसामुळे गावाच्या पुलावरून पाणी वाहू लागले, परिणामी गावाचा बाहेरील संपर्क पूर्णपणे तुटला आहे. गेल्या काही वर्षांपासून पावसाळ्यात या गावाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात रोगराई पसरते, तसेच एखाद्या गर्भवती महिलेला किंवा गंभीर रुग्णाला वेळेत रुग्णालयात नेता येणे अशक्य होते.गावातील नागरिकांनी सरकारने तातडीने गावाला आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली आहे.



# लेहगाव चौफुलीवर दोन वाहनांचा भीषण अपघात पाच जखमी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११शिरखेड** – शिरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लेहगाव चौफुलीवर रविवारी पहाटे दोन वाहनांचा भीषण अपघात झाला. सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी पाच जण गंभीर जखमी झाले आहेत.

हा अपघात शिरखेड पोलीस ठाण्यापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर सकाळी चारच्या सुमारास घडला. नागपूर जिल्ह्यातील लोहारा येथून पर्यटनस्थळ चिखलदरा येथे जाणारी स्कॉर्पिओ (एमएच ३१ ईए ७९४५) आणि अमरावतीवरून मोर्शीकडे जाणारे मालवाहू पिकअप वाहन यांची लेहगाव चौकात समोरासमोर धडक झाली.

मिळालेल्या माहितीनुसार, पिकअप वाहनचालकाने गतिरोधक टाळण्याच्या प्रयत्नात वाहन विरुद्ध दिशेला नेले, यावेळी नेरपिंगळाईकडून चांदूरबाजारकडे जाणाऱ्या स्कॉर्पिओला जोरदार धडक बसली. अपघातानंतर दोन्ही वाहने पलटी झाली.

या अपघातात स्कॉर्पिओतील चालक अभिषेक धोंडू चव्हाण, जगदीश ज्ञानेश्वर पवार, योगेश बंडू चव्हाण तसेच पिकअप चालक विकास कन्हैयालाल (रा. पाढी, पो. चांदपरही, कैमूर, बिहार) यांसह पाच जण जखमी झाले. सर्व जखमींना उपचारासाठी जिल्हा रुग्णालय, अमरावती येथे हलविण्यात आले.


या चौफुलीवर पंधरवड्यापूर्वीही असाच अपघात झाला असून, चौफुलीच्या चारही बाजूंना गतिरोधक बसविण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे. पुढील तपास शिरखेड पोलिस करीत आहेत.

# राज्यशासनाचे विविध उपक्रममहसूल सप्ताहा निमित्त महाराजस्व अभियान

### आ. प्रताप अडसड यांची प्रमुख उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताकदि.११धा. रेल्वे-** महसूल सप्ताहाचे निमित्ताने गुरुवारी महाराजस्व अभियान घेण्यात आले. यावेळी महसूल, ग्रामविकास, पंचायत, बांधकाम, आरोग्य, कृषी इत्यादी विभागातील तब्बल एक हजारांच्यावर समस्यांचे निराकरण करण्यात आले. तहसीलदार अभय घोरपडे यांच्या मार्गदर्शनात महसूल विभागाचा महाराजस्व अभियान यशस्वी केले.शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वतीने तहसील कार्यालयात महसूल सप्ताह २०२५ चे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरेतरप्रमुख अतिथी म्हणून आप्रताप अडसडवनगर परिषददेच्या मुख्याधिकारी पूनम कळंबे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तहसीलदार अभय घोरपडे यांच्या मार्गदर्शनात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून शिबिराला सुरवात करण्यात आली. पारधी व वडार समाज बांधवांना जात प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. आरोग्य विभागाच्या वतीने विविध मोफततपासण्या व औषधोपचार शिबिराचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. तहसिल कार्यालयाच्या सभागृहासमोर विविध विभागांचे स्टॉल लावून नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यात आले. घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेती रॉयल्टी, निराधार योजनांचे आपत्ती ग्रस्त अर्ज, नैसर्गिक लाभार्थ्यांना अनुदानप्रमाणपत्रवपुरवठा विभागातर्फे नवीन शिधापत्रिका वाटप करण्यात आले. शिबिरामध्ये पारधी समाजाचे



जात प्रमाणपत्र ६५ दाखले, १५३ श्रावणबाळ, संजय गांधी योजना लाभार्थी, १४० लोकांच्या आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. ११५ लोकांना प्राधान्य कुटुंब म्हणून शिधा पत्रिका देण्यात आल्या. कृषी विभागातर्फे ६८ लोकांना लाभवितरित केले. २२ फार्मर आयडी तयार केले. आधार अपडेट १७९ लाभार्थ्यांचे करण्यात आले. नगर पालिका तर्फे ६२ लोकांना लाभवितरित करण्यात आले. ४५ लोकांचे आयुष्मान भारत कार्ड वितरित करण्यात आले. घरकुल रेतीसाठी ३५ पास वितरित केले. पोस्ट ऑफिस मार्फत नवीन खाती व इतर लाभ ५२ लाभार्थ्यांना देण्यात आली. पंचायत समितीमार्फत ९५ लाभार्थ्यांना घरकुल आणि रोहयोचे लाभदेण्यात आले.

# सामाजिक संस्थांना मोफत धान्य; यवतमाळात सामाजिक संस्था, संघटना, शासन व प्रशासनाचा समन्वय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११यवतमाळ-**

जिल्ह्यात विविध सामाजिक संस्था शासनाच्या कुठल्याही आर्थिक मदतीशिवाय उत्तमपणे सामाजिक कार्य करत आहेत. मात्र शासन, प्रशासन आणि सामाजिक संस्थांच्या सहयोगातून विविध संस्थांच्या काम अधिक प्रभावीपणे व्हावे, यासाठी शासनस्तरावरून आवश्यक ती सर्व मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी दिली.यवतमाळच्या इतिहासात




पहिल्यांदाच जिल्ह्यात विविध क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक संस्था, संघटना, शासन आणि प्रशासन अशी त्रिस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीसाठी पालकमंत्र्यांनी स्वत: पुढाकार घेतला आणि जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्थांच्या अडचणी जाणून घेत संचालकांशी संवाद साधला. जिल्ह्यात विविध सामाजिक संस्था स्वखर्चाने वयोवृद्धांसाठी वृध्दाश्रम चालवितात. काही संस्था मनोरुग्णांसाठी उत्तम काम करत आहे. पारधी समाजातील मुले, अनाथ मुलांसाठीही जिल्ह्यात चांगले काम होत आहे. या संस्था कुठल्याही शासकीय अनुदानाची अपेक्षा न करता आत्मियतेने, निरपेक्षपणे सामाजिक काम करत आहे. संस्थांचे काम अतिशय कौतुकास्पद व प्रेरणादायी आहे. अशा संस्थांच्या पाठीशी उभे राहणे हे शासन, प्रशासनाचे कर्तव्य आहेच, पण समाजानेही या संस्थांना बळ देण्याची गरज आहे, असे पालकमंत्री राठोड यावेळी बोलताना म्हणाले.

# अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत जिल्ह्यातील ३ रेल्वे स्थानकांचा कायापालट

## रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. ११ :अमरावती-** भारतीय रेल्वेच्या 'अमृत भारत स्टेशन' योजनेंतर्गत राज्यातील एकूण १३२ रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. यात जिल्ह्यातील तीन रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. त्यासोबतच बडनेरा रेल्वे स्थानकाला ३६.३ कोटी आणि धामणगाव रेल्वे स्टेशनला १८ कोटी रुपयांचा निधी दर्जेदार सुविधा उपलब्ध करण्यासाठी देण्यात येणार आहे.या योजनेद्वारे



देशभरातील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत झालेल्या पत्रकार परिषदेवेळी ही माहिती देण्यात आली. महाराष्ट्रातील रेल्वेच्या दर्जेदार पायाभूत सुविधेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री श्री. वैष्णव यांचे आभार मानले.या योजनेत समाविष्ट काही महत्त्वाची स्थानके म्हणजे अमरावती आणि ग्रामीण भागातील स्थानकांमध्ये बडनेरा आणि धामणगाव रेल्वे यांना स्थान देण्यात आले आहे.या योजनेमुळे स्थानकांवर प्रवाशांसाठी वेटिंग लाऊंज, फूड कोर्ट्स, स्वच्छतागृहे, लिफ्ट्स, एस्कलेटर्स आणि डिजिटल सुविधांसारख्या आधुनिक सेवा उपलब्ध होणार आहेत.या पुनर्विकासात स्थानकांची नावे आणि त्यासाठीचा निधी पुढीलप्रमाणे आहे. बडनेरा (३६.३ कोटी), धामणगाव स्टेशन (१८ कोटी) निधी देण्यात येणार आहे

# वन्यप्राण्यांच्या त्रासाला कंटाळून शेतकऱ्यांचे साखळी उपोषण

## समस्येचे निराकरण न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अंजनगासुर्जी**

तालुक्यातील कोकरडा परिसरातील शेतकऱ्यांनी शेतात होत असलेला वन्यप्राण्यांचा हैदोस थांबविण्याची उपाययोजना करण्याची विनंती शासनाकडे करूनही योग्य ती उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने स्वातंत्र्यदिनाच्या काही दिवसांअगोदर प्राथमिक आरोग्य केंद्र लाखनवाडी (कोकर्हा) येथे १० ऑगस्टपासून साखळी उपोषण सुरू केले आहे.

तालुक्यात वन्यप्राण्यांचा हैदोस वाढला असून आधीच संकटात असलेल्या शेती व्यवसायावर अधिकच्या संकटाने शेतकरी पार मेटाकुटीला आला आहे. यातच लाखनवाडी, कोतेगाव, होबाळा, एकलारा, शेडगाव, कोकरडा,पिंपळगव्हाण, चिंचोली, घोडसगाव, हह्यापूर, बेलोरा, कोठा, कमालपूर, तरोडा या परिसरातील शेतकऱ्यांना हरीण, रोही, माकडे, जंगली डुक्कर या हिंसक वन्यप्राण्यांचा मोठा त्रास आहे. हे हिंसक प्राणी शेतकऱ्यांचा शेतातील सोयाबीन, मूग, तूर, कपासी, ज्वारी व इतर पिकांची मोठ्या प्रमाणात नासधूस करत असल्याने शेतकरीवर्ग कमालीचाधास्तावला आहे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांनी संबंधित वनविभाग, सामाजिक वनीकरण विभाग व तहसीलदार अंजनगाव, आ. गजानन लवटे यांना निवेदनाद्वारे माहिती दिली असून वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा, त्याचप्रमाणे शेतकऱ्याऱ्यांना झालेल्या नुकसानीचा मोबदला द्यावा जोपर्यंत वन्यप्राण्यांच्या बंदोबस्त वनविभाग करित नाही व आम्हाला न्याय मिळत नाही, तोपर्यंत उपोषण सुरू राहणार असल्याचे उपोषणकर्ते शेतकरी, शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते, महिला सरपंचासह शेतकरी महिलांचे म्हणणे आहे, तसेच शासनाला इशारा म्हणून १० ते १४ ऑगस्टपर्यंत साखळी उपोषणास सुरुवात करण्यात आली आहे. या उपोषणाची दखल तातडीने न घेतल्यास १५ ऑगस्टपासून आमरण उपोषण करण्याचा इशारा उपोषणकर्ते कृषी उत्पन्न बाजारसमितीचे संचालक रवी उपाध्याय, शेतकरी नेते जयंत देशमुख, प्रकाश भारसाकळे व पंचक्रोशीतील गावांच्या शेतकयांनी दिला आहे.

# एआयचा कमाल! संत्रा बागेतून उत्पन्न ५ लाखांवरून थेट ३० लाख

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील खरपी गावातील प्रगतिशील शेतकरी विजय बिजवे व त्यांचा कृषी पदवीधर मुलगा गौरव बिजवे यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) नाविन्यपूर्ण वापर करून संत्रा उत्पादनात क्रांती घडवून आणली आहे. अवघ्या आठ महिन्यांत त्यांच्या आठ एकर संत्रा बागेतून मिळणारे वार्षिक उत्पन्न ५ लाखांवरून थेट ३० लाखांपर्यंत वाढले असून हा प्रयोग परिसरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



### एआय प्रणालीचा अवलंब

विजय बिजवे यांनी एका खासगी तंत्रज्ञान कंपनीच्या सहकार्याने एआय-आधारित स्मार्ट शेती प्रणाली कार्यान्वित केली. याअंतर्गत संत्रा बागेत पाच प्रकारचे सेन्सर बसवण्यात आले आहेत. हे सर्व सेन्सर उपग्रह तंत्रज्ञानाशी जोडलेले असून, बागेतील माती, हवामान व पिकांच्या आरोग्याविषयीची तंतोतंत माहिती रिअल-टाईममध्ये उपलब्ध होते.

### सेन्सरची कार्यपद्धती

दोन सेन्सर : जमिनीतील ओलाव्याचे अचूक मापन

तिसरा सेन्सर : मातीचे तापमान

चौथा सेन्सर : तापमानातील आर्द्रता

पाचवा सेन्सर : स्थानिक हवामानातील बदलांची माहिती

हे सेन्सर १२ फूट उंच पाइपवर बसवलेल्या सौरऊर्जेवर चालतात. उपलब्ध डेटाच्या आधारे बागेला नेमक्या प्रमाणात पाणी, पोषक तत्त्वे व औषधांची गरज ओळखून त्यानुसार त्वरित कार्यवाही केली जाते.

### उत्पादन व खर्चातील बदल

पूर्वी बिजवे यांचा प्रति एकर वार्षिक खर्च ६० ते ७० हजार रुपये इतका होता, मात्र उत्पादन फक्त ४ ते ५ लाखांच्या आसपास मर्यादित राहायचे. एआय तंत्रज्ञानामुळे झाडांची वाढ, फळांचा दर्जा व उत्पादनात मोठी सुधारणा झाली असून यंदा उत्पन्न तब्बल सहापटीने वाढून ३० लाखांपर्यंत पोहोचणार आहे.

### यशामागील सूत्र

वेळीच मिळालेली अचूक माहिती, पिकासाठी पोषक व जलसिंचन व्यवस्थापनातील काटेकोर नियोजन आणि रोगनियंत्रणाच्या योग्य वेळेवर केल्या जाणाऱ्या उपाययोजना या घटकांमुळे संत्र्यांच्या दर्जात व उत्पादनात लक्षणीय वाढ झाली. बागेतील १५ वर्षे वयाची झाडे सध्या दर्जेदार व विपुल फळांनी लगडलेली आहेत.

### प्रेरणादायी उदाहरण

बिजवे यांचा हा यशस्वी प्रयोग स्थानिक शेतकऱ्यांमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता व आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा संगम वापरल्यास कमी खर्चात जास्त उत्पादन मिळवता येते, याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

# तळेगावात 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत भव्य प्रभातफेरी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११तळेगाव**

आज दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ वाजता हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक कन्या शाळा, जिल्हा परिषद मुलांची शाळा व ग्रामपंचायत कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा उद्देश प्रत्येक नागरिकाने राष्ट्रीय ध्वजाशी वैयक्तिक नाते जोडावे, देशभक्तीची भावना वृद्धिंगत व्हावी तसेच जनमानसात राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश पोहोचवावा हा होता.प्रभातफेरीदरम्यान विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा घेत देशभक्तीपर घोषवाक्ये दिली, देशभक्तीगीतांचा गजर केला आणि संपूर्ण तळेगाव नगरी देशभक्तीच्या वातावरणाने दुमदुमून गेली.या प्रसंगी गावाचे प्रथम नागरिक सरपंचग्रामपंचायत सदस्य, मुख्याध्यापक व शिक्षकवर्ग, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, अंगणवाडी सेविका, दिव्यांग कार्यकर्ते तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत, शाळा व स्थानिक नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले.

# विधीमंडळाची एसटी कल्याण समिति १९ ते २१ ऑगस्ट दरम्यान अमरावती जिल्ह्यात दौरा करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

अमरावती जिल्ह्यात विधीमंडळाची अनुसूचित जमाती (एसटी) कल्याण समिती १९ ते २१ ऑगस्टदरम्यान दौरा करणार आहे. या दौऱ्यात समिती प्रशासकीय बाबींसह विविध शासकीय कार्यालयांमधील अनुसूचित जमातीच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधणार आहे. या दौऱ्यामुळे काही कार्यालय प्रमुख तणावात असून अहवाल तयारीसाठी धावपळ सुरू आहे.



समितीचे प्रमुख आमदार दौलत दरोडा आहेत. सदस्यांमध्ये हरिश्चंद्र भोये, डॉ. मिलिंद नरोटे, केवलराम काळे, राजू तोडसाम, राजेश पाडवी, शांताराम मोरे, मंजुळा गावित, हिरामण खोसकर, आदित्य ठाकरे, रामदास मसराम, उमा खापरे, इद्रिस नायकवडी, राजेश राठोड, सुनिल शिंदे आणि निमंत्रित सदस्य विनोद निकोले यांचा समावेश आहे.

१९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता समितीचे सदस्य शासकीय विश्रामगृहात एकत्र येतील. सकाळी ९.३० ते १० दरम्यान जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींसोबत अनुसूचित जातीच्या कल्याण योजनांबाबत चर्चा होईल. त्यानंतर १० ते ११ दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयात अनुसूचित जमातीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची भरती, आरक्षण, अनुशेष आणि जात पडताळणी विषयांवर चर्चा होईल.

सकाळी ११ ते १२ या वेळेत पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक कार्यालयातील बाबींवर चर्चा होईल. दुपारी १२ ते १२.३० दरम्यान महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक होईल. दुपारी १२.३० ते १ या वेळेत राज्य उत्पादन शुल्क कार्यालयातील अधिकाऱ्यांशी संवाद साधला जाईल.


दुपारी १ ते १.३० या वेळेत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकाऱ्यांसोबत चर्चा होईल. दुपारी २.३० ते ३.३० दरम्यान संत गाडगेबाबा विद्यापीठात अनुसूचित जमाती प्रवर्गातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसंदर्भात बैठक होईल. दुपारी ३.३० ते ५ दरम्यान जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांसोबत चर्चा होईल.

सायंकाळी ५ ते ६:३० दरम्यान एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, धारणी येथील अधिकाऱ्यांसोबत अनुसूचित जमातीच्या कल्याणकारी योजना आणि इतर बाबींवर चर्चा होईल. त्यानंतर समिती शासकीय विश्रामगृहात मुक्काम करेल.

# अमरावती महानगरपालिकेचे आवाहन : 'हर घर तिरंगा २०२५' मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

अमरावतीकर नागरिकांनी राष्ट्रप्रेमाचा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यासाठी 'हर घर तिरंगा २०२५' ही प्रेरणादायी मोहीम पुन्हा सुरू होत आहे. अमरावती महानगरपालिकेतर्फे २ ते १५ ऑगस्टदरम्यान विविध देशभक्तिपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.





या मोहिमेचा उद्देश नागरिकांच्या मनात देशभक्तीची भावना जागवणे व तिरंग्याबद्दल अभिमान वृद्धिंगत करणे हा आहे. यासाठी घरावर, कार्यालयावर, वाहनावर तिरंगा फडकविण्याचे तसेच HarGhar Tiranga2025 हॅशटॅगसह सोशल मीडियावर फोटो शेअर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तिरंगा रांगोळी, राखी स्पर्धा, पत्रलेखन, प्रश्नमंजुषा, बाईक/सायकल रॅली, मानवी साखळी, तिरंगा यात्रा, देशभक्तिपर गीतांचे कार्यक्रम अशा विविध उपक्रमांत सहभागी होण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. 'हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता' मोहिमेतून स्वच्छतेसाठी योगदान देण्याचेही आवाहन आहे.

१३ ते १५ ऑगस्टदरम्यान Www.harghartiranga.com या संकेतस्थळावर तिरंग्यासह सेल्फी/फोटो अपलोड करून सहभागाची नोंद करावी, असे महानगरपालिकेने सांगितले.

# सणासुदीला फळांचे दर गगनाला भिडले

## आरोग्यदायी फळांचे सेवन सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर : सफरचंद, डाळिंब, पिअरसह इतर फळे २०० रुपये किलोवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती :**

ऐन सणासुदीला दिवसातच फळांचे दर गगनाला भिडले आहे. आरोग्यदायी फळांचे सेवन सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर झाल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. सफरचंद, डाळिंब, पिअरसह इतर फळे २०० रुपये किलोवर पोहोचले आहे.



सध्या सण-उत्सवाचे दिवस सुरू असूनप्रसादासाठी व उपवासातील सेवनासाठी फळांना मोठी मागणी आहे. मात्र, आवक कमी आणि वाहतुकीचा वाढलेला खर्च यामुळे सफरचंद, डाळिंब, पिअरसह अनेक फळांचे दर २०० रुपये किलोच्या वर गेले आहेत. केळीचे दरही ४० ते ५० रुपये डझनापर्यंत पोहोचले आहेत.

मोसंबीचा हंगाम नसल्याने ती बाहेरून येत असून १२० ते १५० रुपये किलो दराने विकली जात आहे. ड्रॅगन फ्रूट ७०-८० रुपये नग, तर किवी १७५ रुपये पॅक (तीन नग) दराने मिळत आहे. सफरचंद २०० ते ३५० रुपये, पिअर २२० रुपये आणि डाळिंब २००-२२० रुपये किलो भावाने विक्रीला आहे. फळांच्या किमतींमुळे अनेक ग्राहक अर्धा किलो खरेदीकडे वळत आहेत. दोन प्रकारची फळे घेतली तरी सहज २०० रुपये जातात. वाढते दर पाहता आरोग्यदायी फळांचे सेवन सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे. त्यामुळे आता फळांच्या बाजारावर सर्वसामान्यांची गर्दी कमी झाल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

# जिल्हा परिषद अमरावतीचे मिशन १०० स्कॉलरशीप

## अमरावती जिल्हयातील जि.प. शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी नावीन्यपूर्ण उपक्रम..१२ऑगस्टला शिष्यवृत्ती परीक्षा सराव चाचणीचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

अमरावती जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापाञ यांच्या संकल्पनेतुन *मिशन १०० स्कॉलरशिप* हे जिल्हा परीषद शाळेतील वर्ग ५वी व ८वी च्या विद्यार्थाची स्पर्धा परीक्षेची पूर्व तयारी म्हणुन शिक्षण विभागाच्या सहकार्याने १२ऑगस्टला जिल्हातील ५वीच्या ९२६८व८वीच्या ३७६६अश्या १३०३४ विद्यार्थांची शिष्यवृती परीक्षा सराव चाचणी घेण्यात येणार आहे. जिल्हातील १४ही तालुक्यातील मराठी,उर्दू व सेमी इग्रजी माध्यमाच्या विद्यार्थाना १००%सराव चाचणी दयावी लागणार आहे.विशेष म्हणजे अमरावती जिल्हा परीषद कडून प्रश्न पञिका व उत्तर पञिका सर्व शाळेला पुरविण्यात आल्या आहे.विद्यार्थाचा सराव होऊन शिष्यवृत्ती परीक्षेत १००%यश प्राप्त करावे हा या सराव परीक्षेचा उद्देश आहे अशी माहीती मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापाञ यांनी दिली आहे. जिल्हातील जिल्हा परीषद मधिल विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत यशस्वी व्हावा या करीता जिल्हातील तंज्ञ शिक्षकांच्या मदतीने हे सराव पेपर तयार करण्यात आले आहे.१२ऑगस्टला सर्व पर्यवेक्षिय यंञने मार्फत ही सराव परीक्षा होणार आहे.गटशिक्षणाधिकारी,शिक्षण विस्तार अधिकारी,केंद्रप्रमुख आणि शाळेचे मुख्याध्यापक यांच्या नियंञणात ही सराव परीक्षा होणार आहे.या करीता पेपर १व२ या मध्ये भाषा व गणित आणि दुसरा पेपर इंग्रजी,बुध्दीमंता चाचणी हे विषय राहणार आहे.ही सराव चाचणी झाल्या नंतर या विद्यार्थांचे शिष्यवृत्ती परीक्षेचे सराव वर्ग घेतले जाणार आहे अशी माहीती शिक्षण विभागाच्या अधिकारी यांनी दिली आहे.




**उपक्रमाचे उदिष्टे**

जि.प. शाळांमधील इयत्ता पाचवी आणि आठवीतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढ करणे.विशेषतः आदीवासी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेकरीता पूर्वतयारी करणे.परीक्षेचा सरावकरुन विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करणे.शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा परिषद शाळांमधील मुलांचा सहभाग वाढविणे.शिष्यवृत्ती परीक्षेकरीता आवश्यक संकल्पना विद्यार्थ्यांना स्पष्ट करुन देणे.आत्मविश्वास वाढवून परीक्षार्थींना सक्षम बनविणे.

# कल्याण समितीच्या दौऱ्यासाठी काटेकोरपणे नियोजन करावे- जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

अनुसूचित जमाती कल्याण समितीचा जिल्ह्यातील तीन दिवसांचा दौरा निश्चित झाला आहे. प्रशासकीय स्तरावर कोणतीही उणीव राहू नये, तसेच समितीमधील सदस्यांच्या संभाव्य माहितीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने काटेकोरपणे नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या दि. १९ ते २१ ऑगस्टच्या दरम्यान असलेल्या दौऱ्याच्या अनुषंगाने बैठक पार पडली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, प्रसेनजित चव्हाण, तहसिलदार निलेश खटके, विजय लोखंडे, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे आदी उपस्थित होते.समितीच्या दौऱ्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी सूचना केल्या. यात मागासवर्गीय कक्ष कार्यरत आणि याठिकाणी माहिती अद्यावत असल्याची खात्री करावी. समितीचे सदस्य हे विस्तृत आढावा घेत असल्याने त्यांचे समाधान होईल, अशी माहिती तयार करण्यात यावी. प्रामुख्याने दौऱ्यामध्ये आश्रमशाळा आणि वसतिगृहांना भेटी देण्यात येत असल्यामुळे याठिकाणच्या समस्या जाणून त्या पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा.



यासोबतच क्ट्रॉसिटी अंतर्गत प्रकरणे असल्यास त्याची सद्यस्थिती तयार ठेवावी. तसेच अधिकारी, कर्मचारी यांचे जात प्रमाणपत्र प्रलंबित असल्यास त्याचा पाठपुरावा करून प्राप्त करून घ्यावे.

पेसा क्षेत्रात अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची भरती होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीकोनातून कार्यवाही झाली असल्याची खातरजमा करावी. पोलिस, महावितरण मधील अधिसंख्य पदावरील माहिती तयार ठेवावी. एसटी महामंडळ, विद्यापीठ, शिक्षकांची भरती झाली असल्यास जात प्रमाणपत्र पडताळणीची प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देशही जिल्हाधिकारी यांनी बैठकीत दिले.

# कदमांवर नोटांचा पाऊस! - अमरावतीत ठाकरे गटाचं अनोखं आंदोलन;साडीतून सर्जनशील टिका

विदर्भ प्रजासत्ताक
दि.११अमरावती




शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आज राजकमल चौकात जोरदार जन आक्रोश आंदोलन आयोजित केले. या धमाकेदार आंदोलनात शिवसैनिकांनी प्रतीकात्मक पद्धतीने 'योगेश भाऊचा डान्सबार' भरवून योगेश कदम आणि रामदास कदम यांच्यावर खोट्या नोटांचा वर्षाव करत तीव्र निषेध व्यक्त केला.

'नाच कदम नाच' अशा गगनभेदी घोषणा देत शिवसैनिकांनी योगेश कदम यांचा पुतळा राजकमल चौकामध्ये वाजत-गाजत फिरवला. या आंदोलनात राज्य शासनाच्या विरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत शिवसैनिकांनी सरकारच्या धोरणांवर हल्लाबोल केला. आंदोलनात सहभागी कार्यकर्त्यांनी खोट्या नोटा फेकून कदमांवर भ्रष्टाचाराचा आरोप केला.

जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनाला मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते. या अनोख्या निषेधाने शिवसैनिकांनी आपला रोष प्रभावीपणे मांडला आणि सरकारला जाब विचारण्याची मागणी केली.यावेळी जिल्हाप्रमुख पराग गुडधे,मनोज कडू,नरेंद्र पडोळे,आसावरी ताई देशमुख,प्रदीप बाजड, प्रतिभाताई बोपशेट्टी,मनिषाताई टेंभरे,ज्योतीताई औगड, वर्षा भोंडे,जयश्री कुऱ्हेकर,वैशाली विधाते,वंदना घुगे,प्रफुल भोजने, डॉ निर्मळ,नितीन हटवार,प्रदीप वडतकर, अचलपूर मेळघाट विधानसभा, अश्विन नागे तालुका प्रमुख अचलपूर, नरेंद्र फिसके माजी नगराध्यक्ष अचलपूर, शुभम सपाटे शहरप्रमुख चांदूरबाजार, शैलेश पांडे तालुका प्रमुख चांदूरबाजार, गुजरात फिसके शहर प्रमुख अचलपूर, शंकरराव भेटाळु विभाग प्रमुख,प्रकाश रताळे, विजय खेसे,रूषीकेश सगने,विनोद काळे,प्रकाश रताळे,संतोष श्रीनाथ ,शिचरण नवलकर ,विशाल महेंगे,टिल्लू तिवारी तालुका प्रमुख चिखलदरा, इब्री शहा शहर प्रमुख चिखलदरा. सागर वाटाणे शहर प्रमुख, टिल्लू शर्मा,आशिष वाटाणे उपजिल्हा प्रमुख अचलपूर विधानसभा, मनोहर कोथलकर, पवन बदरके अचलपूर तालुका संघटक, राजकुमार मते,बंडू भाऊ यादव डॉक्टर बेलसरे प्रफुल्ल भोजने प्रमोद भाऊ कोहडे गोपाल मोकलकर संतोष गावंडे शरद पाटील बोदडे बंडूभाऊ साउथ नरेश वानखडे मुकिंदा ठाकरे ओंकार काळे घनश्याम शिंगरवडे गब्बर भाई पठाण संजय होले बाळासाहेब राणे पंकज पिंपळकर डॉक्टर प्रमोद कठाळे नाना देऊळकर सुरेश जुनघरे संदीप कणसे,सुनील कोंडे,प्रवीण हरमकर,विजय ठाकरे,सचिन ठाकरे, रामा सोळंके,अतुल सावरकर,जयंत इंगोले,प्रमोद धानोकर,वैभव मोहोकर,शिवराज चौधरी,दिलीप काकडे,संजय गोंडाने,शकील भाई,विनोद शर्मा,नरेंद्र शेळके,डॉ गिरी,बाळा सावरकर,बाळा तळोकर,बाळ्या शेळके,विनोद शर्मा, यांच्यासह असंख्य शिवसैनिक सहभागी झाले.

# सिंभोरा धरणावर स्वातंत्र्यदिनानिमित्त रोषणाईने सजले नयनरम्य दृश्य



विदर्भ प्रजासत्ताक
दि.११मोर्शी,

मोर्शी तालुक्यातील सिंभोरा येथील पूर्णा मध्यम प्रकल्पावर स्वातंत्र्यदिनानिमित्त आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून, सायंकाळच्या वेळेस धरणाचे दरवाजे नयनरम्य प्रकाशझोताने उजळून निघाले आहेत.


दरवर्षी स्वातंत्र्यदिनानिमित्त तालुक्यात विविध ठिकाणी सांस्कृतिक आणि देशभक्तिपर कार्यक्रमांचे आयोजन होत असते. यंदा पूर्णा प्रकल्पाच्या परिसरात रोषणाई करून पर्यटक आणि स्थानिक नागरिकांसाठी विशेष आकर्षण निर्माण करण्यात आले. रंगीबेरंगी दिव्यांच्या झगमगाटात धरणाच्या पाण्यावर पडणारा प्रकाश परावर्तित होऊन एक देखणा नजारा तयार झाला आहे.

यामुळे परिसरातील अनेक नागरिक आणि पर्यटकांनी सायंकाळी येथे हजेरी लावून हा निसर्गरम्य व विद्युत रोषणाईचा मिलाफ अनुभवला. मुलांनी आणि तरुणांनी मोबाईल कॅमेऱ्यातून या दृश्याचे फोटो व व्हिडिओ टिपून सोशल मीडियावर शेअर केले.स्थानिक ग्रामस्थांनी व पर्यटकांनी प्रशासनाचे आभार मानत दरवर्षी अशा रोषणाईच्या उपक्रमांना प्रोत्साहन देण्याची मागणी केली आहे. या रोषणाईमुळे स्वातंत्र्यदिनाचा उत्साह आणि देशभक्तीचा माहोल अधिकच उंचावला आहे.

# कबुतरांमुळे होऊ शकतात ६० प्रकारचे आजार, दाणे घालाल तर पिंजऱ्यात जाल

## मुंबईमध्ये दाखल झाला पहिला गुन्हा कबुतरांमुळे मानवी आरोग्यावर होऊ शकतात गंभीर परिणाम

विदर्भ प्रजासत्ताक
दि.११अमरावती



शहरात उंच इमारतींच्या टेरेस,बाल्कनी आणि सार्वजनिक ठिकाणी कबुतरांचे थवे उडताना पाहणे आता नित्याचं झालं आहे. अनेक नागरिक त्यांना दाणे-पाणी देऊन पोसतात, पण ही दया शेवटी स्वतःच्या आरोग्यासाठी घातक ठरू शकते, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. कबुतरांच्या विष्ठा, पिसे आणि शरीरावर असणारे सूक्ष्मजंतू मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम करू शकतात.

कबुतरांशी दीर्घकाळ संपर्क आल्यास अस्थमा, ब्रॉन्कायटिस, न्यूमोनिया, हिस्टोप्लाइमोसिस यांसारखे ६०हून सायटॅकोसिस, अधिक आजार होऊ शकतात. या आजारांपैकी काही तर जीवघेणेही ठरू शकतात. कबुतरांच्या विष्ठेत असलेले बुरशीचे बिजाणू हवेत मिसळून श्वसनमार्गाने शरीरात जातात, ज्यामुळे फुफ्फुसांचे कायमस्वरूपी नुकसान होऊ शकते. नागरिकांचे आरोग्य जपण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने सार्वजनिक ठिकाणी कबुतरांना दाणे टाकण्यास बंदी घालण्याचा आदेश दिला आहे. एवढेच नाही तर मुंबईत कलम २२३, २७० आणि २७१ अंतर्गत पहिलाच गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्यामुळे कबुतरांना दाणे टाकणे चांगलेच अंगलट येऊ शकते.कबुतरांच्या विष्ठेमधून हवा व धुळीत मिसळणारे सूक्ष्मजंतू श्वासावाटे शरीरात जातात. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आधीपासून श्वसनविकार असलेले रुग्ण यांना याचा मोठा फटका बसतो.मुंबई उच्च न्यायालयाने नुकताच दिलेल्या आदेशानुसार सार्वजनिक ठिकाणी कबुतरांना दाणे घालण्यास बंदी आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर गुन्हा नोंदविण्यात येणार आहे. नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्याच्या अनुषंगाने असा आदेश देण्यात आला आहे.

**कबुतरांमुळे ६० प्रकारचे गंभीर आजार**

अस्थमा, ब्रॉन्कायटिस, न्यूमोनिया, फ्लू यांसारखे श्वसनविकार, हिस्टोप्लाइमोसिस, सायटॅकोसिस यांसारखे जीवघेणे रोग तसेच विष्ठेमधील जिवाणूंमुळे डोळ्यांचे, त्वचेचे आजार होऊ शकतात.

**गेल्या काही वर्षांत वाढली कबुतरांची संख्या**

शहरातील उंच इमारती, सहज उपलब्ध होणारे खाद्य, आणि संरक्षणासाठी सुरक्षित जागा यामुळे गेल्या काही वर्षांत कबुतरांची संख्या झपाट्याने वाढली आहे. अनेक सार्वजनिक चौक, मंदिर, मशीद परिसर आणि रेल्वेस्थानके कबुतरांचे आश्रयस्थान बनले आहेत.

**बाल्कनी, टेरेसवर कबुतरांचा उच्छाद**

शहरातील अनेक सोसायट्यांमध्ये कबुतरांचा त्रास एवढा वाढला आहे की, बाल्कनी व टेरेसवर पाऊल ठेवणे अवघड झाले आहे. जागोजाग साचणाऱ्या विष्ठेमुळे दुर्गंधी व आजारांचा धोका वाढला आहे.

# साखर महागणार, सणवारात घास कसा गोड लागणार?

## साखरेसोबतच तूर, मूग, मसूर यासारख्या डाळींच्या दरातही वाढीची शक्यता

विदर्भ प्रजासत्ताक
दि.११अमरावती



श्रावण महिना सुरू होताच बाजारात साखरेच्या भावात चढउतार सुरू झाले आहेत. सणासुदीच्या दिवसांत गोड पदार्थ, मिठाई, पेयपदार्थ यांची मागणी वाढते, त्यामुळे साखरेच्या खपात मोठी उसळी येते. यावर्षी मात्र परिस्थिती काही वेगळीच आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील बाजारातील बदल, उत्पादनातील संभाव्य घट आणि निर्यातीतील वाढ या सर्व घटकांमुळे साखरेच्या दरात आधीच तेजी येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

शहरातील घाऊक बाजारात साखरेचा दर किलो ४४ च्या आसपास पोहोचला असून, किरकोळ बाजारातही भावात वाढ दिसून येते आहे. पुढील काही आठवड्यांत दर आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरवाढीमुळे फक्त घरगुती खर्चच वाढणार नाही, तर मिठाई व बेकरी उद्योगांनाही मोठा फटका बसू शकतो. सणासुदीच्या तोंडावर वाढत्या महागाईमुळे नागरिकांना 'गोडवा' जपणं अवघड होणार आहे.सणासुदीच्या काळात अधिक नफा मिळवण्यासाठी काही व्यापारी व कारखाने साखरेचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून दर वाढवण्याचा प्रयत्न करू शकतात, अशी भीती विक्रेत्यांनी व्यक्त केली आहे.

**सणवारात साखरेत तेजी येणार**

बाजारातील मागणी वाढल्याने आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील दरवाढीचा परिणाम म्हणून देशांतर्गत साखरेच्या दरात सणासुदीपूर्वीच तेजी दिसून येणार आहे. साखर कारखान्यांकडूनही साठेबाजीची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# श्रीकृष्ण पेठ गणोशोत्सव साकारणार कार्तिकेय मंदिराचा देखावा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.११अमरावती




गणेशोत्सवात अनोखी सजावट, पूजापाठ आणि अथर्वशीर्ष पठणासाठी नावाजलेल्या श्रीकृष्ण पेठ गणेश मंडळात यंदा कार्तिकेय मंदिराचा देखावा राहणार आहे.

दक्षिण भारतात मुरुगन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शिवपुत्र तथा श्रीगणेशाचे ज्येष्ठ बंधू कार्तिकेयचे सर्वात मोठे आणि प्रसिद्ध मंदिर तमिळनाडूच्या डिंडिगुल जिल्ह्यातील पलनी शहरात आहे. १६० मीटर उंचीच्या शिवगिरी पर्वतावर मुरुगन स्वामींचे मंदिर आहे. त्याचे प्रतिरूप उभारले जाणार असल्याचे मंडळाच्या कार्यकारिणीत ठरले.

मंडळाच्या बैठकीत नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी सागर खंडेलवाल, उपाध्यक्षपदी मोहित अग्रवाल व अक्षय कोठारी, सचिवपदी मोहित श्राफ,सहसचिवपदी तनय नांगलिया, कोषाध्यक्षपदी यश राठी, सहकोषाध्यक्षपदी ऋषी घाडगे, तर सिद्धार्थ बोथरा, सौरभ दीक्षित, रोहन चिमोटे, गौरव लुनावत, संकेत मेहता, नौमित विश्वकर्मा, सागर जडिया, उत्कर्ष पडोले, आनंद बजाज, पार्थ भट्टड, सत्यजित रघुवंशी हे कार्यकारिणी सदस्य आहेत. बैठकीला कोमल बोथरा, मिलिंद चिमोटे, धीरेंद्र अग्रवाल, बालाजी बोबडे, राजेश अग्रवाल, बालू गुल्हाने, विनोद पाचघरे, विवेकानंद गाजले, संजय जैन, सदानंद गाजले,सोहन कलंत्री आदी उपस्थित होते.

# फिनले मिलमध्ये पुन्हा शोले आंदोलन




विदर्भ प्रजासत्ताक
दि.११अचलपूर

अचलपूर येथील फिनले मिलमधील कामगारांचे वेतन गेल्या तीन महिन्यांपासून थकले असून बोनसही न मिळाल्याने कामगारांनी पुन्हा एकदा मिलच्या चिमणीवर चढून शोले आंदोलन सुरू केले आहे. आज आंदोलनाचा पाचवा दिवस असून, प्रशासनाच्या उदासीन भूमिकेबद्दल कामगार संतप्त आहेत.

सुमारे दोन अडीच महिन्यांपूर्वीही दोन कर्मचाऱ्यांनी याच पद्धतीने चिमणीवर चढून आंदोलन केले होते. त्यावेळी प्रशासनाने बैठक घेऊन बोनस व वेतन देण्याचे आश्वासन दिले होते; मात्र आता पुन्हा कोणतीही कारवाई किंवा बैठक न झाल्याने कामगार नाराज आहेत.कामगार नेते विकी उघडे यांनी सांगितले की, प्रशासनातील कोणीही बैठकीला उपस्थित राहत नसल्याने कामगार त्रस्त झाले आहेत. आमच्या मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरू राहनार असल्याचे सांगण्यात आले.

# 'हर हर बोला महादेव'चा गजर ; सातपुड्याच्या पर्वत रांगेत निसर्ग सौंदर्य आणि धार्मिकतेचा संगम; श्री क्षेत्र धारगड यात्रा महोत्सवाला प्रारंभ



विदर्भ प्रजासत्ताक
दि.११अकोला

नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या सातपुडा पर्वतात दरवर्षी श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारी धारगडमध्ये यात्रा महोत्सव भरतो. निसर्ग सौंदर्य आणि धार्मिकतेचा सुरेख संगम असलेला हा महोत्सव १० व ११ ऑगस्टला होत आहे. शिवभक्तांचे आराध्य दैवत श्री क्षेत्र धारगड येथे 'हर हर बोला महादेव' च्या गजरात हजारो भक्तगण रविवारपासून येथे दाखल झाले.

श्री क्षेत्र धारगड येथे प्राचीन शिवालय असून, हे सातपुड्याच्या पर्वत रांगामध्ये वसले आहे. समुद्र सपाटीपासून तीन हजार फुट उंचीवर नरनाळा किल्ल्याच्या छातीशी असलेल्या चार कोणी गुहामध्ये दोन स्वयंभू शिवलिंग व नंदी आहे. महादेवाचे हे शिवलिंग केव्हा व कसे निर्माण झाले, याचा कुठलाही ठोस पुरावा इतिहासात आढळत नाही. या बाबत आख्यायिका मात्र ऐकावयास मिळतात. संपूर्ण वऱ्हाड हे दंडकारण्यात समाविष्ठ होते.

महाभारतकालिन राजकुमार एकलव्य यांच्या पित्याचा दंडकारण्यात अंमल होता. एकलव्य व त्यांचे पिता हे महादेवाचे निस्सीम भक्त होते. त्यांनीच या शिवलिंगांची स्थापना केली, अशी आख्यायिका आहे, तर दुसरी आख्यायिका अशी की नरनाळा किल्ल्याच्या सरदाराची पत्नी शिवभक्त होती. तिनेच सरदाराला शिवलिंग स्थापना करायला लावली असेही बोलले जाते. मात्र, याबाबत कुठलाही पुरावा इतिहासात आढळून येत नाही. या गुहेच्या काही अंतरावरच एक लहान भुयार असून येथे एक शिवलिंग व नंदी आहे.

धारगड अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा तालुक्यात असले तरी धारगडला जाण्याकरिता सोईस्कर मार्ग हा अकोला जिल्ह्यातील अकोटवरून आहे. त्यामुळे धारगड यात्रेचे खरे महत्त्व हे अकोटलाच दिसून येते. धारगडला जाण्यासाठी अकोट आगारातून बसेसची व्यवस्था करण्यात येते. त्यामुळे अकोटातील रस्ते भक्तांनी फुलून जातात. धारगड हे पूर्वी दुर्गम भागात होते. आता मात्र बसेस सोबत खासगी वाहने सुद्धा धारगड टी पाईंटपर्यंत जाऊ शकतात. श्री क्षेत्र धारगड हे अकोट वरून पाऊल वाटेने जवळपास २५ किमी अंतरावर येत असून प्रमुख मार्गाने ३७ किमी दूर येते. बहुतांश शिवभक्त हे पाऊल वाटेनेच जाणे पसंत करतात.

पूर्णा नदीच्या जलानी भरलेली कावड खाद्यांवर घेऊन भक्तगण अकोटवरून पोपटखेड मार्गाने जातात. डफडीच्या तालावर 'हर हर महादेव' असा गजर करीत धारगड येथे पोहचतात व कावडीने आणलेल्या पूर्णा नदीच्या पाण्याने मोठ्या महादेवाच्या शिवलिंगावर जलाभिषेक करतात. तेथून काही भक्त लहान महादेवावर जातात. यावर्षी सुद्धा हा यात्रा महोत्सव १० व ११ ऑगस्टला उत्साहात होत आहे.

**नटलेला मनमोहक परिसर**

श्री क्षेत्र धारगड येथे निसर्ग निर्मित धबधबा भक्तांवर जणू जलाभिषेक करतो. निसर्गाने बांधलेली भक्तांची पूजा प्रत्यक्ष अनुभवण्यासारखीच असते. सर्वत्र हिरवेगार वातावरण, नद्या-नल्यांमध्ये झुळझुळणारे पाणी, निसर्ग सौंदर्याने नटलेला मनमोहक सूर्या धबधबा व निसर्गाने परिधान केलेला हिरवा शालू यामुळे भक्तगणांना धारगडचे वेध लागतात.